

REFBK-0011614
विषय चरित्र
सं. क्र. ९०३९

# रँग्लर परांजपे

# पंडित गोविंद वल्लभ पंत

(चरित्र)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३१२.७६...... वि: ...[illegible]......
क्रमांक ... 9077 ... नों: दि: ...

लेखक :

रंजन परमार

REFBK-0011614

स ह्या द्रि प्र का श न, पु णें, २.

मूल्य : दीड रुपया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ११६१८

प्रकाशक :

**गो. वा. सोनसळे**

सह्याद्रि प्रकाशन,

१२० नारायण पेठ, पुणें २.

लेखक :

**रंजन परमार**

३११, रविवार पेठ, पुणें २.

आवृत्ति पहिली :

१५ ऑगस्ट १९६१

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :

**म. के. कुलकर्णी**

नीलिमा मुद्रणालय,

४८४ शनिवार पेठ, पुणें २.

मुख्य मंत्री

सत्यमेव जयते

महाराष्ट्र

सचिवालय, मुंबई ३२.

दिनांक ५ एप्रिल १९६१

भारतांतील अग्रगण्य पुढाऱ्यांत ज्यांची गणना करता येईल असे एक थोर पुरुष, गंभीर मुत्सद्दी व नामवंत समाजसेवक म्हणून पंडित गोविंद वल्लभ पंत यांचा आपल्याला प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्य लढ्यांत भाग घेतल्यापासून तो थेट स्वतंत्र भारताच्या राज्यशकटाची धुरा शेवटच्या क्षणापर्यंत यशस्वी रीतीने त्यांनी सांभाळली यावरून त्यांच्या मोठेपणाची आपणांस कल्पना येईल. भारतीय क्रांतीमधून जी नररत्ने निर्माण झाली त्यामध्ये पंडित पंत यांनी आपल्या देशसेवेने एक विशिष्ठ स्थान प्राप्त करून घेतले होते या थोर पुढाऱ्याचे छोटेसे जीवनचरित्र सह्याद्रि प्रकाशनातर्फे प्रसिद्ध होत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या अनेकविध पैलूंपासून तरुणांना पुष्कळ बोध घेता येण्यासारखा आहे. त्यांच्या जीवनचरित्रापासून भावी पिढीला स्फूर्ति मिळेल व त्यांनी घालून दिलेला देशसेवेचा मार्ग आक्रमण करण्यास ते प्रवृत्त होतील अशी मला आशा आहे.

# निवेदन

पं. गोविंद वल्लभ पंत याचें नांव भारताबाहेरील लोकांना तितकेसे माहीत नसले तरी भारतात त्यांचे नांव माहीत नसलेला सुशिक्षित विरळाच ! पं. नेहरूंचे मार्गदर्शक, सल्लागार उजवे हात इत्यादी विविध स्वरूपाची कामगिरी पं. पंतांनी बजावलेलीं आहे भारताच्या अंतर्गत व्यवस्थेच्या बाबतीत कै. वल्लभभाई पटेल यांच्या नंतर पं. पंतांचेच नांव घेतलें जातें. त्यांच्या सारखा खंबीर गंभीर पोलादी नेता सुदैवानेंच मिळतो. पं. पंत मूळचे महाराष्ट्राचे रहिवाशी ! त्या दृष्टीनें त्यांचे चरित्र उद्‌बोधक ठरेल. ज्या थोर विभूतीनें आपलें आयुष्य समाज राष्ट्र आणि संस्कृतीच्या उन्नति-करितां वेंचलें त्या थोर विभूती संबंधीं माहिती करून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक भारतीयास असल्यास नवल नाहीं.

हे चरित्र लिहितांना जन्मभूमि, लोकतंत्र (गुजराथी) सकाळ विशाल सह्याद्री, केसरी व हिंदुस्थान, आज, नवभारत टाईम्स (हिंदी) इत्यादी वर्तमान पत्रांतील माहितीचा उपयोग मी करून घेतला आहे त्या बद्दल त्यांचा ऋणी आहे.

सौ. सुनीता बावळे यांनीं हे चरित्र तयार करण्यांत जास्तीत-जास्त सहकार्य दिले आहे. त्या स्वत: मराठी घेऊन एम्. ए. झाल्या आहेत. त्यांना हिंदी वाङमयाची अत्यंत आवड आहे. त्यांनी जे अमोल सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेच स्वराज्याचे संपादक श्री. मो. स. साठे माझे मित्र श्री. ग. वा. करमरकर, श्री. मु. मा. जगताप, तेजपाल शहा, कु. शैलजा यांनी चरित्र लिहिण्याच्या कामी जे सहकार्य दिले त्या बद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहे. तसेच हे चरित्र लिहून घेण्यापासून ते प्रकाशनापर्यंत माझे मित्र व सह्याद्रि प्रकाशनाचे चालक श्री. सोनसळे यांनी जी धडाडी व उत्साह दाखवला त्याबद्दल त्यांचे जेवढें आभार मानावे तेवढे थोडे आहेत.

★

ज्यांनीं आपले जीवन समाज,
राष्ट्र आणि संस्कृतीच्या
उन्नतीकरितां वेचलें त्या,

**श्री. पोपटलाल शाह**

यांस
सादर समर्पित

★

## रंजन परमार यांचे लेखनसाहित्य

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण | चरित्र | हिंदी |
| भारतरत्न टण्डनजी | ,, | ,, |
| शतावधानी मुनिराज | ,, | ,, |
| अमर यशोविजयजी | ,, | ,, |
| मुरारजी देसाई | ,, | ,, |
| महाराष्ट्र के सपूत | ,, | ,, |
| भाऊराव पाटील | ,, | ,, |
| डॉ. राधाकृष्णन् | ,, | ,, |
| पं. गोविंदवल्लभ पंत | ,, | हिन्दी–मराठी |
| राज कपूर | ,, | ,, |

### – हिंदीत अनुवादित साहित्य –

| | |
|---|---|
| यात्रा | साने गुरुजी |
| चित्रमय रामायण | भैय्या साहब ओंकार |
| गांवगुंडा | ग. ल. ठोकल |
| जलवंती | के. नारखेडे |
| बुध्ददेव | गोपीनाथ तलवलकर |
| सपन सुहाने | सं. गो. साटे |
| कामायनी | गंगाधर महाम्बरे |

: १ : परिचय

भारतीय सणांत रंगपंचमीला एक वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. आनंदाचा व उत्साहाचा हा सण. ह्या दिवशीं भारताच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत, नगाधिराज हिमालयापासून हिंदी महासागराच्या उन्नत लाटांनीं ज्याचें पादपूजन केलें जातें, अशा तीर्थक्षेत्र सेतुबंध रामेश्वरापर्यंत, परमयोगेश्वर श्रीकृष्णाच्या लीलाक्षेत्र गुजराथ प्रदेशापासून मातृभूमीच्या मुक्ततेकरतां वेडेपिसे झालेल्या बंगाली तरुणांची जन्मभूमी व गुरुदेव श्री रवींद्रनाथ ठाकूरांच्या शांतीगीतांनीं ध्वनित होणाऱ्या सस्यश्यामला आणि समृद्ध बंगाल प्रदेशापर्यंत हजारों स्त्री-पुरुष आबालवृद्ध, रावरंक, धर्म, जाती आणि संप्रदाय आणि वर्णभेद विसरून, भेदभाव विसरून रंग खेळतात आणि प्रेमाची देवाण-घेवाण करतात. परंतु ह्या वर्षाची रंगपंचमी भारतीय जनतेला शोकाचा आणि दु:खाचा संदेश घेऊनच उगवली. गेल्या कांहीं दिवसांपासून यमराजाशीं रणक्षेत्रावर झगडणारी, भारताच्या सांस्कृतिक, राजनीतिक, सामाजिक व त्याचप्रमाणें आध्यात्मिक क्षेत्राचें प्रतिनिधित्व करणारी एक श्रेष्ठ व्यक्ति कालवश झाली. सर्वश्रेष्ठ, नरशार्दूल, असाधारण व्यक्तित्व असलेले गांधी-युगांतील उरल्या सुरल्या विभूतींपैकीं श्रेष्ठ, आपले गृह-मंत्री पंडित गोविंद वल्लभपंत मृत्यूच्या महाभयंकर युद्धांत पराभूत झाले. परंतु भारताचे भीष्म, पितामह पंडित पंतांच्या दु:खपूर्ण देहावसानानें गुजराथी काव्यपंक्ति ' मृत्युकीपण मरी गयुंरी लोल ' यथार्थ आहे. यमराजाच्या बरोबर पंडतजींचा हा पहिलाच सामना

नव्हता. ह्या पूर्वीच निर्घृण काळानें त्यांच्यावर जोराचा हल्ला केला. परंतु छोटयाशा गणतंत्र भारताच्या नवनिर्मितीच्या हेतुबद्दल अंत:करणांत अपार श्रद्धा ठेवून प्रबल आत्मबलानें, दृढनिश्चयानें त्याचप्रमाणें असाधारण कर्तृत्वानें काळाशीं सतत लढत शेवटपर्यंत पंडित पंत आपल्या मार्गावर अविचल राहिले. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या खांद्याला खांदा भिडवून, राष्ट्रीय ऐक्य देशाचें आंतरिक संरक्षण, संवर्धन आणि संगठनास संरक्षण देण्याच्या प्रचंड पुरुषर्थास कायम राखण्याकरतां ते वर्षानुवर्षे आपल्या तब्येतीची जरा सुद्धां काळजी न करतां चालत राहिले. ह्या सर्व प्रवृत्तींना कार्यस्वरूप देतांना त्यांनीं जे अविश्रांत परिश्रम केले, अडचणींना तोंड दिलें, अनेक कष्ट झेलले, ब्रिटिश नोकरशाहीचे पाशवी अत्याचार सहन केले ते बघून इतक्या दिवस काळाशीं सामना कशा रीतीनें केला हें समजणें एक कोडेंच आहे. शेवटीं मृत्युदेवतेचा विजय होऊन भारताच्या नभमंडलांतील एका परमतेजस्वी नक्षत्राचा लोप झाला. आपले राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसादांच्या शब्दांत सांगावयाचें झालें तर, "एक मोठा आधारस्तंभ पडला, एक अद्भुत ज्योति अकालीच काळाच्या प्रचंड तडाख्यानें विझून गेली." महान दार्शनिक, उपराष्ट्राध्यक्ष सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या शब्दांत सांगण्याचें झालें तर "पंडित पंतांच्या व्यक्तित्वांत, सहजबुद्धी-स्पष्टता, समतोलपणा, न्यायीपणा आणि देशभक्ति आदि गुणांचा दूध-साखरेसारखा समन्वय झाला होता. ते हिमालयासारखे श्रेष्ठ आणि सागरासारखे गंभीर होते. अति बिकट प्रसंगांत देखील त्यांनीं कधीं विवेक सोडला नाहीं."

गांधी युगांतील श्रेष्ठ, ज्येष्ठ, जाज्वल्यमान कणखर महापुरुष, सरदार वल्लभभाई पटेल, दादासाहेब मावळणकर, मौलाना अब्दुल–

कलम आझाद आदि विभूति एकामागून एक अस्तंगत झाल्या, आणि ज्या आज शिल्लक आहेत, त्यांच्याविषयीं जर विचार करूं लागलों तर असें वाटतें कीं, जणूं सहस्त्र वर्षांनंतरहि ज्याची पुनरावृत्ति होणें शक्य नाहीं असें एक युग आपल्या डोळ्यासमोरून अदृश्य झालें. ज्या महापुरुषांनीं, गुलामगिरीच्या सांखळीनें जखडलेली-ब्रिटिश सत्तेच्या क्रूर पंजांत सांपडलेल्या भारतमातेला मुक्त केलें, त्यांनीं जेव्हां प्रशासनाचीं सूत्रें हातीं घेतलीं तेव्हां थोड्याच काला, वधींत असें दाखवून दिले कीं स्वातंत्र्य संगरांतील सैनिक, सेनापति व कार्यदक्षतेनें, निपुणतेनें राज्यसंचालन करणाऱ्या व्यक्ति ह्या एकच आहेत. त्या सर्वश्रेष्ठ महान विभूतींमध्येंच आपल्या चरित्र नायकाची—गोविंद वल्लभपंतांची गणना केली जाते.

★

## : २ : बालपण आणि शिक्षण

पंडित पंत मूळचे देशस्थ ब्राह्मण. महाराष्ट्राच्या राजकारणांत आणि ऐतिहासिक परंपरेंत ह्या वर्गाचें एक विशिष्ट आणि महत्त्वाचें स्थान आहे. नामदार गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, रानडे, मराठ्यांच्या साम्राज्यशाहीचे आधारस्तंभ पेशवे हे सर्वजण ह्याच वर्गाचे प्रतिनिधि होते. देशस्थ ब्राह्मणांची हद्द समुद्रापासून कोंकण भागापर्यंत. त्यांत रत्नागिरी जिल्हा फारच प्रसिद्ध. देशस्थ ब्राह्मणांच्या साहसी वृत्तीचें, तेजस्वी बुद्धीचें, शिस्तीचें भोक्ते, अनुशासनाच्या आवडीचा व त्याचप्रमाणें कार्यकौशल्याचें दर्शन स्वर्गस्थ गृहमंत्र्याच्या रोजच्या जीवनांत घडत असे. पंतांचे वाडवडील साहसप्रिय, सामर्थ्यवान आणि भावनाप्रधान होते. सह्याद्रीच्या कुशींत

बसलेल्या महाराष्ट्राचा त्याग करून, नगाधिराज हिमालयाच्या पदस्पर्शानें पुनित झालेल्या कूर्माचल प्रदेशांत कसें बस्तान बसविलें ? ह्याचा उलेख करतांना पंडित बद्रीदास पांडेनीं "कुमायूचा इतिहास" " ह्या पुस्तकांत लिहिलें आहे कीं, जेव्हां प्रवासाचीं कांहीं साधनें नव्हतीं, रेल्वे आणि मोटारींचें अस्तित्व आपल्या देशांत नव्हतें, जाण्या-येण्याचा वाहतुकीचा मार्ग नव्हता, सर्व देशांत घनदाट अरण्यें होतीं त्यावेळेस पंतांचे पूर्वज आणि पांडे, जोशी, उपाध्याय आदि कुटुंबें उत्तर भारतांतील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बद्री केदारनाथाच्या यात्रेस गेलें होतें. यात्रेहून परत येतांना बर्फाच्छादित नगाधिराज हिमालयाच्या मनोहारी दृश्ययुक्त, त्याच्याच पायथ्याशीं वसलेल्या अलमोडाच्या राजानें पंतांच्या पूर्वजांची विद्वत्ता व अलौकिक प्रतिभासामर्थ्यावर आकृष्ट होऊन त्यांना आपल्या राज्यांत वसण्याचें आमंत्रण दिलें. नैनीतालच्या डोंगराळ प्रदेशाच्या रम्य वनश्रीनें भरलेला आसपासचा प्रदेश आणि तेथील पवित्र वातावरणाकडे ते आकर्षित झाले व तेथेंच त्यांनीं आपलें बस्तान बसविलें. परत महाराष्ट्रांत कांहीं आले नाहींत. कूर्माचलास कुमायू असेंहि म्हणतात. त्याची गणना उत्तर प्रदेशांतील डोंगराळ इलाख्यांत केली जाते.

कालाच्या ओघांत पंतांचा परिवार आपल्या अद्वितीय विद्वत्तेनें, असाधारण मनोधैर्यानें, शुद्ध चारित्र्यानें, सौम्य स्वभावानें, अदम्य कार्यशक्तीनें आणि कर्तव्य परायणातेनें ह्या इलाख्यांतील श्रेष्ठ परिवार बनला. तेथील ब्राह्मणवर्गांत त्यांना नवीनच स्थान प्राप्त झालें. त्यांच्याबरोबर रोटीबेटी व्यवहार सुरू झाला. महाराष्ट्री संस्कृतीचे उत्तम गुण घेऊन त्यांचा परिवार उत्तर भारताच्या लाघवी संस्कृतीबरोबर रममाण, समरस झाला. आणि एका नवीनच समाजाचा

पाया घातला गेला. आज कुमायू इलाख्यांत आणि जिल्ह्यांत पंत ब्राह्मण परिवार अस्तित्वांत आहे आणि त्याच बरोबर स्थानिक जनता त्यांच्याकडे आदर सन्मानाच्या दृष्टीनें पहाते. हिंदीचे सुप्रसिद्ध युगप्रवर्तक कवि पद्मभूषण सुमित्रानंद पंत, निबंध मालाकार श्री कृष्णानंद पंत आणि सुप्रसिद्ध नाटककार गोविंद वल्लभपंत ह्याच घराण्याचे वंशज, पंतांचे पूर्वज सुरुवातीला नैनीतालच्या जिल्ह्यांत सिलोटी गांवांत रहात होते, आज देखील तेथें त्यांची मिळकत व जायदाद आहे.

ह्या घराण्याचे एक वंशज पंडित मनोरथ पंत. ते स्याहीदेवी पर्वतराजीनें वेढलेल्या, सृष्टीसौंदर्यानें नटलेल्या खुंट नांवाच्या गांवांत रहात होते. भारताच्या सात लाख खेड्यांपैकींच खुंट अलमोडा प्रांतांत वसलेलें एक खेडें आहे. तेथें समृद्धी बेताचीच आहे· पंडित मनोरथ पंत मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारे एक सरकारी नोकर होते. म्हणून त्यांची आर्थिक स्थिति बेताबाताचीच होती. ह्याच पंडित मनोरथ पंतांच्या घराण्यांत इ. स. १८८७ च्या सप्टेंबरच्या १० तारखेस चरित्रनायक गोविंद वल्लभ पंतांचा जन्म झाला. घराण्यांत पहिलाच मुलगा असल्याकारणानें चरित्रनायकाच्या जन्मानंतर आनंदोत्सव साजरे केले गेले. आप्तइष्ट व नातेवाईकांना आमंत्रणें गेलीं. सर्वांसमक्ष उत्साहानें नांव ठेवण्याचा विधि झाला आणि बालकाचें नांव गोविंद वल्लभ ठेवलें.

बाळ गोविंदाचें आईवडिलांच्या प्रेमळ छायेंत, लाडानें पालन पोषण व्हावयास लागलें. बोबड्या बोलांनीं आणि खोडसाळपणानें त्यांनें सर्वांचीं मनें मोहून टाकलीं. लहानपणींच त्यांची जन्मकुंडली तयार करतांना ज्योतिषानें सांगितलें होतें की, "हा मोठा भाग्य-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..................... दि: .....................

वान असून त्याच्या नशिबीं राजयोग आहे. तो पुढें मोठा पराक्रमी होईल आणि राजा होईल." गोविंदाच्या भविष्याबद्दल संपूर्ण हकिकत ऐकल्यावर मनोरथपंतांचा आनंद गगनांत मावेना. गोविंदाखेरीज त्यांना एक मुलगी होती.

पंडित मनोरथ पंत प्रदेशाच्या महसूल विभागांत अधिकारी असल्याकारणानें सदोदित त्यांना फिरतीवर जावें लागे. त्यांना स्थायी घरच नव्हतें. म्हणून त्यांनीं बाळ गोविंदास अध्ययनाकरतां आजोळीं अलमोड्यास पाठवून दिलें. त्याच्या आजोबांचा धाक अलमोडा प्रांतांत, आसपासच्या इलाख्यांत होता. ते एक श्रेष्ठ राज्यकार्यकारी होते. त्यांना सर्व जनतेकडून मान मिळत असे. अलौकिक व्यक्तिमत्व असलेल्या बद्रीदास जोश्यांचे इंग्रजी अधिकाऱ्यांवर खास वजन होतें. कूर्माचल प्रदेशाच्या प्रशासनास सुरळीत रीतीनें एकत्रित करण्याकरतां बद्रीदासजीनें तत्कालीन इंग्रज कमिशनर श्री. रैमजेस सक्रिय मदत देऊन प्रांतीय इंग्रजी अंमलांत आपलें महत्वाचें स्थान निर्माण केलें. त्याबरोबरच ब्रिटिश सरकारनें रायबहाद्दूर पदवी देऊन त्यांचा गौरव केला. त्याकाळीं ही पदवी धारण करणाऱ्याचें सरकार-दरबारांत विशेष वजन असे. अशा प्रतिष्ठित, प्रभावशाली सभ्य गृहस्थांच्या निकट सान्निध्यांत आणि मार्गदर्शनाखालीं किशोर गोविंदानें आपले प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पुरें केलें. अशा रीतीनें चरित्रनायक गोविंदाचें बालपण आणि किशोरावस्था अत्यंत सुखासमाधानांत व्यतीत झाली.

किशोर गोविंदाचें पालन-पोषण कूर्माचलाच्या डोंगराळ इलाख्याच्या रम्य वातावरणांत आणि भारतीय संस्कृतीनें युक्त अशा पहाडी लोकांत झालें. बालपणापासूनच त्यास मैदानी खेळांची

आवड नव्हती. क्रीडेसारख्या मनोरंजनपर प्रवृत्तींकडे त्याचा विशेष ओढा नव्हता, त्यापेक्षां वाचन, पाठांतर, वादविवाद, प्रवास, सृष्टीनिरीक्षण आदि प्रत्येक बाबतींत स्वत: अनुभव घेण्यांत त्यांना विशेष गोडी वाटत असे. नवीन नवीन पुस्तकें वाचणें, नवीन स्थळांचें निरीक्षण करणें आणि नवीन गोष्टींना जवळून पारखण्यांत बाळ गोविंद नेहमीं दंग असे. पण त्यांना बॅडमिंटन या विदेशी खेळाचा शोक होता. अलमोडाच्या माध्यमिक शाळेंत वादविवाद सभा आणि स्पर्धेंत तो उत्साहानें भाग घेत असे. शाळेंत आपल्या मित्रांच्या सहाय्यानें त्यानें एक वादविवाद मंडळ स्थापन केलें होतें. सभेंत दर आठवड्याला नव्या विषयावर साधक बाधक चर्चा होऊन वादविवाद होत असे. कधीं कधीं एखाद्या खास विषयावर परिसंवाद ठेवण्यांत येत असे. त्यांतील बहुतेक विषय तत्कालीन राजकीय परिस्थितीशीं संबंधित असत. त्याचा परिणाम असा झाला कीं, शाळेंत विद्यार्थीच काय पण शिक्षक देखील वादविवादस भेंत सक्रिय भाग घ्यावयास लागले. इ. स. १९०३ मध्यें गोविंदानें मॅट्रिक परीक्षा आणि १९०५ मध्यें इंटरमिजिएट परीक्षा सन्मान्यपूर्वक पास केली.

पंतांचे आजोबा रायबहाद्दूर पंडित बद्रीदास जोशी तत्कालीन इंग्रजी सरकारचे एक वरिष्ठ आणि स्वामिभक्त अधिकारी होते. ब्रिटिश सरकारनें नेपाळच्या हद्दींत मोडणाऱ्या कूर्माचल प्रदेशास ज्या कूटनीति आणि डावपेंचानें घशाखालीं घातलें होतें त्याचें रहस्य त्यांना माहीत होतें. कारण इ. स. १९१६ त आणि त्याच्या पूर्वींहि पंडित बद्रीदास जोशींचे पूर्वज नेपाळच्या गुरखा शासन तंत्राच्या प्रतिनिधीच्या रूपानें कूर्माचल प्रदेशाच्या राजकार्याची धुरा वाहत होते. कूर्माचल प्रदेश इंग्रजांनीं ताब्यांत घेतला त्यास

कारण नेपाळी लोकांची आपआपसांतील दुही होती. सामान्यपणें भारतांत जें झालें त्याचीच पुनरावृत्ति नेपाळमध्यें झाली आणि कुमायूचा वनसंपत्तीनें समृद्ध डोंगराळ प्रदेश त्यांनीं घशांत घातला. ह्या सर्व घटना गोविंद लहानपणापासून ऐकत होता. परिणाम म्हणून किशोर वयांतच राजकाणाचें व्यापक आणि व्यावहारिक ज्ञानाचें बीजारोपण झालें.

अलमोडा कॉलेज मधून इंटरमिजिएटची परीक्षा उत्तम क्रमांक मिळवून पास झाल्यावर पंडित बद्रीदासजीनें आपल्या कुशाग्र बुद्धीच्या नातवाला उच्च शिक्षणाकरतां दुसऱ्या ठिकाणीं पाठवण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणें प्रयागच्या प्रसिद्ध "म्योर सेंट्रल कॉलेज." शिक्षण संस्थेंत प्रवेश मिळवून दिला. त्या काळची ती एक नांवाजलेली उच्च शिक्षण संस्था होती. कालांतरानें त्यांतच अलाहाबाद विश्वविद्यालयाचा पाया घातला गेला. ह्याच कॉलेजमध्यें कित्येक नामांकित भारतीयांनीं विद्याध्ययन केलें. मध्य प्रदेशाचे मुख्य मंत्री डॉक्टर कैलासनाथ काटजू, काँग्रेसचे माजी अध्यक्ष भारतरत्न राजर्षि पुरुषोत्तमदास टंडन, प्रसिद्ध समाजवादी स्वर्गीय आचार्य नरेंद्रदेव, सर्वश्री शिवप्रसाद गुप्त, श्री व्यंकटेश नारायण तिवारी, पंडित हृदयनाथ कुंझरू हे त्यांतील प्रमुख होत. गोविंदपंताची पहिली वृत्ति कायम होती. माध्यमिक शाळेंत नवे मित्र, नवें वातावरण आणि नव्या ठिकाणामुळें गोविंद पंतांत हळूहळू बदल होऊं लागला. त्यांच्या वृत्तीला नवीन दिशा मिळाली, नवें खाद्य मिळालें. अपरिपक्व बुद्धि परिपक्व होऊं लागली, नवीन नवीन गोष्टी आत्मसात् करायला लागली. एकदां त्यांनीं माघ यात्रेच्या वेळीं प्रयागच्या त्रिवेणीसंगमावर यात्रेकरूंच्या मोठ्या मेळाव्यांत प्रवचन केलें. त्यांचा हा सार्वत्रिक असा पहिलाच कार्यक्रम होता

आणि विद्यार्थीदशेंतील राजकारणांत सक्रिय भाग घेण्याचा पहिलाच प्रसंग. प्रवचनांतून तत्कालीन ब्रिटिश सत्तेविषयींची असंतोषाची भावना प्रकर्षानें दिसत होती. सरकारी अधिकाऱ्यांना त्यांत विद्रोहाचा वास येत होता. कॉलेजचे अधिकारी नाराज झाले. सर्वत्र भीतीचें वातावरण पसरलें. गोविंद पंतांना कॉलेज मधून काढून टाकलें. परंतु त्यांना कॉलेजमधून काढून टाकतांच क्षणींच विद्यार्थ्यांनीं एक नवीन चळबळ केली. कॉलेज अधिकाऱ्यांच्या तंगड्या त्यांच्याच गळ्यांत आल्या शेवटीं, स्वर्गीय पंडित मदनमोहन मालवीयांनीं दोन्ही पक्षांचा समेट घडवून आणला आणि पंतांना मोठ्या मानानें परत कॉलेजमध्यें प्रवेश मिळाला. नंतर पंतांनीं १९०७ मध्यें बी. ए. आणि १९०९ मध्यें एल्. एल्. बी. परीक्षा पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण केली. हुषार विद्यार्थी म्हणून लुम्सडेन सुवर्ण पदक त्यांना देण्यांत आलें.

★

## : ३ : राजकारणांत प्रवेश

चरित्र नायक कै. पंडित गोविंद वल्लभ पंताच्या राजकारणाचा आणि सामाजिक कार्याचा आरंभ १९०५ मध्यें अलाहाबादच्या म्योर सेंट्रल कॉलेजमध्येंच कुशाग्र बुद्धीच्या आणि प्रतिभासंपन्न विद्यार्थीदशेंतच झाला. पहिल्या प्रथम पंतजी उदार मनाच्या पंडित मदनमोदन मालवीयांच्या सहवासांत आले. त्यांनीं स्वतःच एके ठिकाणीं लिहिलें आहे, "ज्यांच्या चरणांपाशीं बसून सार्वजनिक जीवनाचा श्रीगणेशा शिकलों ते उदार मनाचे मालवीयजीच होते." कॉलेजमध्यें असतांना सर तेजबहाद्दूर सप्रूंचा त्यांच्यावर अत्यंत

प्रभाव पडला. त्याच सालीं भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले प्रयागला आले होते. निरनिराळ्या संस्थांनीं गोखल्यांच्या भाषणाचे कार्यक्रम ठेवले होते. पहिल्या प्रथमच पंतजी इतक्या जवळून गोखल्यांना बघत होते आणि त्यांचें भाषण ऐकत होते. १९०५ मध्यें वाराणशीस भर था अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं गोखल्यांचें दर्शन घडलें होतें. कै. गोखल्यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें आणि प्रथमच पंत कॉंग्रेसच्या स्वयंसेवकाच्या रूपानें त्यांत सहभागी झाले होते. गोखल्यांच्या विद्वत्तापूर्ण आणि राष्ट्रीयतेनें भारावलेल्या भाषणानें चरित्र नायकाच्या अंत:करणांतील जागृत राष्ट्रभावनेस उजळा दिला. अधिक प्रखर बनविले. रायबहाद्दर पंडित बद्रीदास जोशी, महामन, पंडित मदनमोहन मालवीय, सर तेज बहाद्दर सप्रू, भारतसेवक गोपालकृष्ण गोखले आणि तत्कालीन राजकीय हालचालीनें निर्माण झालेल्या राष्ट्रभावनेच्या आहारी पंतजी देखील हळूहळू गेलें.

तरुण पंतजी उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्याकरतां आणि त्याच बरोबर स्वत: समाजकार्य व राजनीतिक कार्य करण्याच्या हेतूनें अलमोड्यास परत येऊन समाजसेवा, देशसेवा आणि वकिलीकरितां उपयुक्त जागेच्या शोधास लागले. त्यांना असें वाटत असे कीं, कोणत्याहि गोष्टीला जड आणि मजबूत केल्यावर सर्व कांहीं मजबूत होतें. म्हणून सुरवातीलाच अलमोड्यांतील राणीखेतसारखें मोठें ठिकाण पसंत न करतां काशीपुरा पसंत करून तेथें आपलें बस्तान बसविलें. थोड्याच अवधींत यश मिळाल्यावर पंतजींनीं अलमोडा आणि नैनीतालमध्यें वकिली करण्यास सुरुवात केली. थोड्याच कालांत ते सर्व कूर्माचल प्रदेश आणि रूहेलखंडांतील अव्वल दर्जाचे वकील बनले. पहाडी प्रदेशांतील नामांकित आणि

प्रतिष्ठित वकीलांत ह्यांची गणना होऊं लागली. प्राप्तीचे सर्व मार्ग खुले झाले. पैशाचा पाऊस पडण्यास सुरुवात झाली. त्यांनीं खोटचा आणि कज्जादलालींच्या प्रकरणांस स्पर्श केला नाहीं. हातांत घेतलेल्या प्रत्येक प्रकरणांत हमखास यश मिळविलें. पक्षाच्या समर्थनाकरतां न्यायालयांत कायद्यांची पुरवणी, उदाहरणें आणि पुस्तकांची चवड रचत असत. त्यांनीं केलेले तर्क नेहमींच बुद्धि-मत्तेचे अद्वितीय नमुने असत. स्वतः मॅजिस्ट्रेट देखील एकचित्तानें त्यांचे तर्क आणि सुटकेचा मार्ग ऐकत असे. परंतु त्यांच्या ठिकाणीं एक दुर्बलता होती कीं, जी जीवनाच्या अंतापर्यंत देखील टिकून राहिली. प्रत्येक ठिकाणीं उशीरा जाण्याची दुर्बलता त्यांच्या ठिकाणीं होती. कधीं कधीं तर वेळेवर पोंहचण्याकरतां त्यांना पळावें देखील लागत असे. परिणाम स्वरूप मॅजिस्ट्रेट आणि अशील दोघांच्यावर कठीण प्रसंग येत असे. असें असून देखील अशीलांना दुसरा मार्गच नसे. आपल्या वाक्चातुर्यानें आणि प्रतिभेनें न्यायालयांत उच्च स्थान मिळवलेली त्यांच्याशिवाय दुसरी व्यक्ति नव्हती. म्हणून नाईलाजास्तव सर्वांनाच तेजस्वी पंतांच्या आश्रयास यावें लागत असे. पंतजींचे निकटचे स्नेही आणि घनिष्ट मित्र मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री डॉ. कैलासनाथ काटजू एके ठिकाणीं म्हणतात, " राज-कारणास जर त्यांनीं जीवनांत स्थान न देतां वकिली केली असती तर पंतांची गणना राष्ट्राच्या नामांकित कायदे पंडितांत झाली असती."

कीर्ति आणि लक्ष्मी चारी बाजूनें वर्षाव करीत असून देखील पंतजींचा आत्मा असमाधानी होता. हृदय सदोदित राष्ट्रसेवा आणि समाजसेवेकरतां तिळतिळ तुटत असे. जनगंगेच्या सेवेंत तन मनानें अर्पण होण्याची इच्छा नेहमींच रहात असे. त्यांतच त्यांच्या

आत्म्याला शांति मिळत असे. त्या काळांत सर्वंच कुमायू इलाख्यांत वेठ मजुरीची घातक प्रथा होती. मोठमोठे जमीनदार, तालुकेदार, सरकारी हुद्देदार आणि इतर पहाडी प्रजेकडून वेठ मजुरीची घातुक प्रथा फुकटांत चैन करून घेत असत. इकडे पहाडी लोकांची स्थिति दुःसहनीयच होती. प्रत्येक दिवशीं त्यांना शेंठ सावकार आणि हुद्देदार जमीनदारांच्या जुलुमांची शिकार होणें भाग पडत होते. भोळ्याभाबड्या पहाडी जनतेचें रक्त शोषण करून एक वर्ग अधिक संपन्न होत होता. तरुण पंतजींच्या डोळ्यांदेखत ह्या सर्व घटना होत होत्या. त्यांना ह्या नागाच्या विळख्यापासून पहाडी जनतेला सोडविण्याची इच्छा होती.

फलस्वरूप त्यांनीं सन १९१६ त पहाडी जनतेंत नव चैतन्य निर्माण करण्याकरतां आणि आपल्या हक्काची जाणीव करून देण्याकरतां "कुमायू परिषदे"ची स्थापना केली. ह्या परिषदेच्या सहाय्यानें पंतजीनें कूर्माचलांतील वेठ मजुरीचें मूळच उखडून टाकलें आणि त्या घातक प्रथेच्या मुळांतच धाव घातला. शोषित वर्गाच्या बाजूनें आवाज दिला, मूक अशिक्षित पहाडी प्रजेला वाणीप्रदान केली. त्याच प्रमाणें सन १९१९ च्या मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणांची कास धरून जेव्हां इंग्रजांनीं कुमायूंच्या आदिवासी आणि पहाडी जनतेला त्या सुधारणांचे धडे दिले; आणि हिमालयाच्या सौंदर्यदायक आणि प्रभावी वातावरणाची मजा लुटण्याचें षड्यंत्र जेव्हां रचलें तेव्हां पंतजीनें प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांना यश येऊं दिलें नाहीं.

सन १९०५ मध्यें पंतजींचें लक्ष देशाच्या राष्ट्रीय भविष्याकडे वेधलें गेलें. वाराणशीच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं स्वयंसेवक म्हणून भाग देखील घेतला होता. तत्कालीन राजनीतीचें

नेतृत्व करणारे महामना पंडित मदनमोहन मालवीय, गोखलेजी आदींच्या भाषणांनीं ते प्रभावित झाले होते. टिळकांच्या ‘मराठा’ नांवाच्या इंग्रजी वर्तमानपत्राचें ते नियमानें रोज वाचन करीत. परंतु पंतांच्या राष्ट्रीय भावनेला सर्वांत उग्र स्वरूप देण्याचें काम कोणी केलें असेल तर ते श्री. बंकीमचंद्र चटोपाध्याय यांच्या ‘आनंदमठ’ आणि ‘वंदेमातरम्’ या प्रसिद्ध कादंबरीनें आणि गीतानें. आनंदमठ वाचून पंतजी इतके प्रभावीत झाले कीं, त्यांनीं भावी कालांत कॉंग्रेसमध्यें सक्रिय कार्य करण्याचा दृढनिश्चय केला.

त्यानंतर मात्र पंतांनीं राजनींतींत सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली. सन १९१६ त राष्ट्रीय कॉंग्रेसच्यांत स्थापन झालेल्या मवाळ आणि जहाल पक्षांत समेट होण्यामुळें राजकाणाला एक नवीनच वळण लागलें. भारतमातेच्या मुक्तीकरितां नवीन योजना आणि नवीन कार्यक्रमांची आंखणी करण्यांत आली. ह्या वर्षींच्या कॉंग्रेसच्या लखनऊच्या अधिवेशनांत ते एक प्रतिनिधि म्हणून सामिल झाले. ज्या ठिकाणीं त्यांनीं गांधीजी आणि राष्ट्रकोकिला स्वर्गीय सरोजिनी नायडूंचीं भाषणें प्रथमच ऐकलीं होतीं त्या कुमायू इलाख्याचे सदस्य म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्या दिवसापासून त्यांचा आणि राष्ट्रपिता बापूजींचा सहवास घडला.

★

## : ४ : राजकारणी पंत

सन १९२० मध्यें पूज्य महात्माजींच्या आदेशानुसार पंतजींनीं उत्तम प्रकारें चाललेल्या वकीलीस लाथाडून, झुगारून देऊन राजकारणांत सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली. त्या वेळीं ते

अलाहाबादेच्या उच्च न्यायालयांत वकिली करीत होते आणि संयुक्त प्रांताच्या उच्च कायदे पंडितांत एक विशिष्ट स्थान राखून होते. परंतु भारतमातेच्या मुक्तीकरितां बापूजींचा आदेश येतांच घरच्या लक्ष्मीला लाथाडून राष्ट्राच्या बलिवेदीवर स्वत:चें बलिदान करण्यास ते निघाले. त्या काळांत असेंच कांहीं वारे वाहत होते कीं पृथ्वीवरील श्रेष्ठ, ज्येष्ठ, शासनसंस्था ब्रिटिश सत्तेशीं, श्रद्धास्थान महात्माजींसारख्या दुर्बल व्यक्तीनें भारतीयांच्या बाजूनें सामना देण्याचें ठरवितांच देशाच्या कानाकोपऱ्यांतून भारतीय गटागटानें व उत्साहानें त्यांत सामील झाले. त्यांत वर्षानुवर्ष इंग्रजी प्रशासनाच्या तालमींत तयार झालेले वरिष्ठ अधिकारी, कायदे पडित, प्राध्यापक आणि शिक्षक, कॉलेज विद्यार्थी, धंदेवाले, आणि व्यापारी आबाल वृद्ध, स्त्री--पुरुष त्याचप्रमाणें गरीब श्रीमंत सर्वजण होते. सहस्त्रावधि लोकांनीं असहयोग आंदोलनांत सक्रिय भाग घेऊन कारावासाच्या यमयातना भोगल्या, सरकारी नोकरांचा जुलूम दृढतापूर्वक सहन केला. परंतु तें मागें हटले नाहींत. पण चौरी चौरा प्रकरणामुळें महात्माजींनीं आंदोलन स्थगित केलें. कांहीं कालावधी-नंतर सरकारनें मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणांची घोषणा केली. कॉंग्रेसला ह्या सुधारणा पोकळ वाटल्या म्हणून गांधींजींच्या आदेशानुसार या सुधारणांचा विरोध करण्याचा निर्णय घेतला. पंतजी शासन सुधारणांवर बहिष्कार घालण्याच्या विरोधी होते. त्यांचें असें मत होतें कीं, जर राष्ट्रवादींच्याकडून लोकांनीं विधान सभेवर बहिष्कार घातला गेला तर सरकार राष्ट्रविरोधी प्रवृतींत संविधानिक शासन प्रणालीचा उपयोग करेल. म्हणून त्यांनीं कॉंग्रेसच्या नेत्यांपुढें पुढीलप्रमाणें प्रस्ताव मांडला, " विधान सभेवर बहिष्कार घालून सुधारणांचें निरर्थकत्व शाबीत करण्यापेक्षां

विधानसभेंत जाऊन आपल्या कार्याच्या द्वारें ब्रिटिश शासन सुधारणांचें बिंग फोडणें केव्हांहि जास्त चांगलें. " ह्या विचारानुसारच पंतजींनीं स्वतंत्र उमेदवाराच्या रूपानें निवडणूक लढविली. परंतु त्यांत ते पराजित झाले.

पुढें ह्या विचारसरणीस, देशरत्न पंडित मोतीलाल नेहरू आणि देशबंधु चितरंजनदासांकडून पुष्टी मिळाली, समर्थन केलें गेलें. म्हणून सन १९२३ मध्यें त्यांनीं स्वराज्य दलाच्या प्रतिनिधिपदावरून संयुक्त प्रांताच्या विधानसभेकरतां पुन्हां एकदां निवडणूक लढविली. काशी मतदार संघातर्फे ते उभे होते. मवाळ पक्षानें आपल्या विरुद्ध हिंदू विश्वविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे तत्कालीन अध्यक्ष कै. पं. का. तेलंग यांना उभें केलें होतें. निवडणूक जोरानें लढविली गेली आणि ते निवडून आले. विधानसभेंत स्वराज्यदलाचे फक्त ३० प्रतिनिधि निवडले गेले होते. पंडित मोतीलाल नेहरू आणि देशबंधु चित्तरंजनदास स्वराज्य दलाचे सर्वमान्य नेते होते. परंतु ते विधानसभा स्वराज्यदलाचे नेते होऊं शकत नव्हते. म्हणून विधानसभेच्या पार्टीकरतां नेता निवडण्याचा प्रश्न उपस्थित झाला. जी व्यक्ति विधानसभेंत विरोधी पक्षाचें नेतृत्व स्वीकारून स्वराज्यदलाच्या आकांक्षा संपूर्णतयः पूर्ण करूं शकेल अशा एखाद्या व्यक्तीच्या शोधांत पंडित मोतीलालजी होते. एकदां ते प्रेक्षक गॅलरींत बसले असतांना त्यांनीं पंतांचें कुमायू इलाख्याच्या जंगलांसंबंधीचें विधायक स्वरूपाचें भाषण ऐकलें. तेव्हा ते पंतांची तार्किकता, विशाल बुद्धिमता आणि अलौकिक प्रतिभेनें अत्यंत भारावून गेले, मंत्रमुग्ध झाले. तेव्हांच त्यांनीं पंतांना स्वराज्य दलाच्या विधानसभेच्या नेत्याच्या रूपानें निवडलें आणि त्यांना इ. स. १९२३ ते १९२९ ह्या प्रदीर्घ कालांत संयुक्त

प्रांत विधानसभेच्या विरोधी दलाचें नेतृत्व केलें. त्यांनीं आपल्या कारकीर्दीत दलास सामर्थ्य मिळवून आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. विरोधी दलाचें नेतृत्व करतांना त्यांनीं जी असाधारण बुद्धिमत्ता आणि व्यवहारकुशलता दाखविली त्यानें संयुक्त प्रांताचा तत्कालीन गव्हर्नर देखील प्रभावित झाल्याखेरीज राहिला नाहीं. गव्हर्नरनें सायमन कमिशनच्या नांवानें जो अहवाल पाठवला होता त्यांत स्पष्ट उल्लेख होता कीं "विधान परिषदेंत आग्रा शेतकी विधेयकावर झालेल्या चर्चेंत विरोधी दलानें जें प्रभावशाली पाऊल टाकलें आहे त्याच्यामागें पंतांची प्रेरणाच कार्य करीत होती."

त्या वेळेस माँटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांना महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न बनविण्याचा आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा आटोकाट प्रयत्न सरकार करीत होते. सन १९२४ च्या संयुक्त प्रांतांच्या विधानसभेंत पंडित पंतांनीं सरकारच्या ह्या प्रयत्नांची अत्यंत कटु शब्दांत आलोचना केली. शासन सुधारणांचा जोरदार आणि तर्कसंगत भाषणाद्वारें इतका प्रबल विरोध केला कीं प्रस्तुत सुधारणांच्या विरुद्ध प्रस्ताव प्रस्तुत केला. पाकिस्तानचे पहिले प्रधान मंत्री पै. लियाकत अलीखानावरील प्रसंगाचा उल्लेख करून एकेठिकाणीं पंतांविषयीं म्हणाले, "माझ्या १७ महिन्यांच्या संयुक्त प्रांताच्या विधानसभेच्या सभासदत्वाच्या कालांत पंतजींच्या इतकें आपल्या पक्षाचें सफल नेतृत्व करणारा दुसरा नेता मी पाहिला नाहीं." राजनीतिक जीवनाच्या प्रभातकालांत ज्या असाधारण वादविवाद कौशल्याचा, असामान्य क्षमतेचा आणि अलौकिक प्रतिभेचा परिचय पंतांनीं प्रांतीय विधानसभेच्या विरोधी दलाच्या नेतृत्वाच्या रूपानें दिला होता त्याच वादविवाद कौशल्याचा, क्षमतेचा आणि प्रतिभेचा, केंद्रीय असेंब्लीमध्यें काँग्रेस पक्षाचा

उपनेता, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणें भारत सरकारचे स्वराष्ट्रमंत्री झाल्यावर पुन्हां उदय झाला.

वादात्मक प्रश्नांचा निकाल लावणें किंवा त्यांच्या मर्मभेदाचा शोध करण्याबाबत नेमलेल्या समितीचे आदर्श चेअरमन म्हणून पंतजी विशेष प्रसिद्ध होते. कोणत्याहि प्रकारची गडबड अथवा गोंधळ न करतां शांतपणें आपलें काम करीत राहणें हेंच पंतांचें खास वैशिष्टय होय. कोणत्याहि प्रश्नाचे बारकावे शोधून त्याला उपयुक्त असा मार्ग शोधून काढणें म्हणजे पंतांच्या हातचा मळ होता. कोणतीहि जबाबदारी यशस्वीपणें तडीस नेण्यास ते संपूर्ण समर्थ होते. म्हणूनच सन १९१६ ते १९३० च्या दीर्घकालांत त्यांनीं कॉंग्रेस पक्षाच्या निरनिराळ्या जबाबदारीच्या स्थानाचीं कामें पूर्ण करून कार्यकुशलता आणि बुद्धिमत्तेची साक्ष वेळोवेळीं दिली. सन १९२७ मध्यें सर्वानुमतें संयुक्त प्रांत कॉंग्रेस समितीच्या अध्यक्षपदीं त्यांची नेमणूक करण्यांत आली आणि अलिगडच्या अधिवेशनाचें अध्यक्षपद त्यांनीं भूषविलें होतें.

ब्रिटिश सरकारनें मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कार्यान्वित करण्याच्या हेतूनें ज्या कमिशनची नेमणूक केली त्याचें नेतृत्व सायमन नांवाच्या राजनीतिनिपुण इंग्रजाकडे होतें. कमिशनचे इतर सभासद इंग्रजच होते; एकाहि भारतीयाला त्यांत स्थान नव्हतें. म्हणून कॉंग्रेसनें सर्वांच्या संमतीनें सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणें कमिशनच्या दौऱ्याच्या वेळीं विरोध दर्शविण्याकरितां ठिकठिकाणीं मोठ्या सभा, प्रचंड मिरवणुका आणि काळीं निशाणें दाखविण्याचा मोठाच कार्यक्रम कॉंग्रेसनें आंखला. भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाची ही पहिलीच वेळ

२

होती. प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणांत राष्ट्रसेवा आणि भारत-मातेच्या मुक्तीची भावना ठासून भरलेली होती. राष्ट्रहिताकरितां प्राणत्याग करण्यास प्रत्येक जण एका पायावर तयार होता. सायमन कमिशनच्या लाहोर आगमनाच्या वेळीं लाला लजपतरायवर बेसुमार आणि बेदरकारपणें लाठीहल्ला करण्यांत आला होता, ते जबर जखमी झाले आणि त्यांतच त्यांचा अंत झाला. भारतीयांच्या रोषरूपी अग्नीला प्रज्वलित करणाऱ्या इंधनाप्रमाणें ह्या घटनेनें आपलें काम केलें. ठिकठिकाणीं जोरदार निदर्शनें करण्यांत आलीं. आतां लखनौची पाळी होती. सायमन कमिशन लखनौमध्यें आल्यानंतर प्रचंड मिरवणुका काढून, सहस्रावधि लोकांच्या साक्षीनें काँग्रेसच्या स्वयंसेवकांनीं काळीं निशाणें घेऊन कमिशनास विरोध दर्शविला. पोलिस अधिकाऱ्यांनीं त्यांना स्टेशन-पासून चार पांच मैलांवरच थोपवून धरलें. ह्या स्वयंसेवक संघाच्या दोन तुकड्यांचें नेतृत्व आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्याकडे होतें. हे लोक स्टेशन-पासून सुमारें शंभर दीडशें पावलांवर असतील तोंच घोडे-स्वार पोलिसांनीं मिरवणुकीवर बेजबाबदारपणें आक्रमण केलें. त्यांनीं रांगेनें उभे असलेल्या स्वयंसेवक संघाच्या तुकडीमध्यें घोडीं दामटून मिरवणूक उध्वस्त केली आणि लाठी घेऊन स्वयंसेवकांवर तुटून पडले. लोक जीव बचावण्याकरतां आसपास पांगले तेव्हां त्यांचा पाठपुरावा करून अत्यंत निर्दयतेनें त्यांना पिटण्यांत आलें. रस्त्यावर राहिले फक्त नेहरू आणि घोडेस्वार पोलिस. ह्या गडबडींत पंतांची तुकडी तेथें येऊन हजर झाली. त्यांना देखील निर्दयपणें मार खावा लागला. परंतु ते डगमगले नाहींत, धैर्य सोडलें नाहीं. पंडित नेहरू आणि पंतांच्या नेतृत्वाखालीं स्वयंसेवक

एकत्रित होऊन परत तेथें जमा झाले. त्यांना पोलिसांची वा अधिकाऱ्यांची भीति नव्हती, हृदयांतील राष्ट्रीय भावनेच्या प्रज्वलित अग्निमध्यें ते सर्वजण धुमसत होते, परत पोलीस घोडेस्वार दौडत आले आणि स्वयंसेवकांना तुडवीत चिरडीत तुफानासारखे नाहींसे झाले. परत स्वयंसेवकांवर पायदळाच्या आणि घोडेस्वारांच्या लाठ्यांचा मारा होऊं लागला. स्वातंत्र्याचे वेडे पीर भयंकर आणि असह्य मार हूं कीं चूं न करतां सहन करीत होते, त्यावेळीं पंडित पंतांच्यामुळें नेहरूंच्यांवर विशेष हल्ला झाला नाहीं. पंतांच्या विशाल, उंच्या पुऱ्या देहयष्टीनें ढालीचें काम केलें. पोलिसांनीं जे प्रहार केले ते नेहरूंना न लागतां पंतांना लागले. त्याविषयीं पंडित नेहरू आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात. " परंतु नशीब, मला कुठेंच जखम झाली नव्हती. आमच्या कित्येक साथीदारांना जबर जखमा झाल्या होत्या. माझ्या शेजारींच असलेल्या पंतांवर खूप हल्ला झाला. कारण ते सहा फूटांहून जास्तच उंचे पुरे होते. म्हणून पोलिसांच्या तावडींत ते झटकन् सांपडले. त्यावेळीं त्यांना ज्या जखमा झाल्या त्यांनीं ते दीर्घकाल पर्यंत असह्य वेदनांनीं पीडिले गेले. इतकी वेळ आली कीं, कित्येक दिवस त्यांची कमर ताठ होत नव्हती. त्यामुळें ते ज्यादा काम देखील करूं शकत नव्हते. " सायमन कमिशन भारतांत आल्यावर पोलिसांच्या शिष्टपणाचा आणि अत्याचारांचा कळसच झाला. नोकरशाहीनें निर्दयपणें जुलमास सुरुवात केली. मन मानेल तसें वागले, त्यांच्या पाशवी अत्याचाराला दोन भारतीय बळी पडले; एक लाला लजपतराय आणि दुसरे पंडित गोविंद वल्लभ पंत. लजपतराय त्यामुळें मृत्यूमुखी पडले आणि त्या मारामुळें पंतांच्या

शरीराचें आणि डोक्याचें सुरूं झालेलें कंपन शेवटपर्यंत कायम राहिलें. खरोखरच हे दोघेजण रथी आणि महारथींच्या समान होते.

सन १९२९ मध्यें झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनाचे अध्यक्ष तरुण हृदयाचे सम्राट पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांच्या नेतृत्वाखालीं सर्वानुमतें स्वातंत्र्याचा ठराव पास झाला आणि २६ जानेवारी स्वातंत्र्याचा दिन म्हणून साजरा करण्याचा आदेश जनतेला देण्यांत आला. संयुक्त प्रांताच्या इतर प्रतिनिधींबरोबर पंतांनींहि ह्या अधिवेशनांत भाग घेतला. लाहोर काँग्रेसनें देशाला एक नवीन दिशा दाखविली. काँग्रेसनें आपल्या नीतींत बदल घडवून आणला होता. त्यांनींच भारताकरितां वसाहतीच्या स्वराज्याऐवजीं संपूर्ण स्वतंत्र्याचें समर्थन केलें होतें. लाहोराच्या ठरावामुळें जनतेमध्यें उत्साहाचें आणि उत्सुकतेचें एक अदभुत वातावरण निर्माण केलें होतें. २६ जानेवारी १९३० चा दिवस उगवला आणि बिजलीप्रमाणें त्यानें ब्रिटीश साम्राज्याच्या धुरीणांना दाखवून दिलें की, देशांत ताजें रक्त आहे आणि उत्साह आहे. देशाचा कोपरान् कोपरा राष्ट्रीय भावनेनें ओतप्रोत भरलेला आहे. आबाल–वृद्ध सर्वजण पूज्य महात्माजींच्या पाठीशीं आहेत. त्या दिवशीं ठिकठिकाणीं सभा झाल्या; प्रचंड सभांतून संपूर्ण स्वातंत्र्याची लोकांनीं शपथ घेतली.

इ.स १९२९ मध्येंच ब्रिटीश सरकारनें आंखलेल्या गोलमेज परिषदेच्या वेळीं काँग्रेसनें विधानसभेचा त्याग केला. लाहोर काँग्रेसच्या नंतर सर्व जनतेनें मोठ्या प्रमाणांत स्वातंत्र्यतेचा दिवस साजरा करून पूज्य महात्माजींच्या अजोड नेतृत्वाविषयीं विश्वास

प्रकट केला. कायदेभंग आंदोलनाची वेळ जसजशी जवळ येऊं लागली तशी जनतेच्या राष्ट्रीय भावनेला व उत्साहाला उधाण येऊं लागलें. प्रांताचे नेते आपआपल्या प्रांतांत सविनय कायदेभंगाच्या चळवळीची जोरांत तयारी करीत होते. चौरी चौरा प्रकरणामुळें गांधींनीं मागची चळवळ मध्येंच थांबविली होती; त्याची पुनरावृत्ति नको म्हणून सर्वजण जागरूक होते. पूज्य बापूंनीं मीठाचा कायदा तोडण्याचा आपला दृढनिश्चय जाहीर करून साबरमतीच्या आश्रमापासून दांडीयात्रेस सुरुवात केली. काँग्रेसनें चळवळीचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत घेतलीं आणि चळवळीच्या संचलनासाठीं डिक्टेटरची नेमणूक केली. सरकारनें कांग्रेसचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरूंना एप्रिलमध्यें आणि गांधीजींना मे मध्यें अटक करण्यांत आली. गोविंद पंत देखील अटकेपासून मुक्त झाले नाहींत. सविनय कायदेभंगाच्या अपराधाखालीं त्यांना देखील तुरुंगांत डांबण्यांत आलें.

गेल्या कांहीं दिवसांपासून संयुक्त प्रांतांत महसुलाऐवजीं साऱ्याचें प्रमाण मोठ्या तेजीनें वाढत होतें. त्यामुळें त्याची स्थिति सारखी बिघडत चालली होती. इकडे सरकारच्या महसूल आणि जमीनदारांच्या साऱ्यांत सारखी वाढ होत होती. त्यांचें प्रमाण ५ : १ असें होतें. परिणाम म्हणून सरकार आणि जमीनदारांच्या प्राप्तींत सारखी वाढ होत होती आणि किसानांना एक वेळच्या खाण्याची देखील भ्रांत पडत होती. त्यांतच भर म्हणून वेळोवेळीं दुष्काळ पडत असे, पूर येत असे, गारा पडत असत, टोळ शेत खाऊन टाकीत असत; इत्यादि करणांमुळें शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति दिवसेन् दिवस अत्यंत हलाखीची होत चालली होती. त्याला सरकारी महसूल आणि जमीनदाराचा सारा देतां देतां तो टेकीस

येई. वीतभर जमीनीच्या तुकड्याकरतां सेठ सावकारांकडून कर्ज घ्यावें लागत असे. परिणाम असा होत असें कीं ती सोडवून घेतां घेतां त्यांच्या नाकीनव येत. आणि हळुहळू आपलें सर्वस्वी विकून बसत इकडे सावकारांची तर चंगळ होत होती. ते शेतकऱ्यांच्या जमिनी घशांत घालून जमिनीचे मालक बनून गेले आणि जमिनीचे खरे वारसदार शेतकरी त्यांच्या चरणाचा दास झाला. आणि आलेल्या प्रत्येक दिवशीं त्यांस जमीनदाराचें गुरकावणें, धाक दडपशा ऐकावा लागे; त्याचप्रमाणें तलाठ्याच्या निर्दय अत्याचारास बळी पडावें लागत असे. ह्या अन्यायास तोंड फोडण्याकरतां अलाहाबाद कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष राजर्षि पुरुषोत्तमदास टंडननीं प्रथम आवाज दिला. प्रांतांत करबंदीची चळवळ जोरांत चालू झाली. सरकार आणि जमीनदार गडबडून जागे झाले. शेतकऱ्यांच्यांत पसरलेल्या असंतोषाच्या भावनेचें उच्चाटण करण्याकरतां त्यांनीं दमन नीतीचा आसरा घेतला. प्रांतांची स्थिति विषमच होत गेली. त्याचा शेवट करण्याकरतां शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळण्याची तजवीज करण्याकरतां प्रांतीक कॉंग्रेसनें गोविंद पंतांना आपल्या बाजूचे मध्यस्त नेमले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचें निराकरण करवून घेण्यासाठीं पंत सरकारशीं सारखा पत्रव्यवहार करीत राहिले. परंतु सरकारच्या बाबतींत "पालथ्या घड्यावर पाणी" अशी स्थिति झाली. सतत पत्रव्यवहार केल्यामुळें शेवटीं विवश होऊन सरकारनें सरकारी अधिकारी व विधान परिषदेंतील कांहीं जमीनदार सभासदांची एक समिति ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरतां नेमली. शेतकऱ्यांचा एकहि प्रतिनिधि त्यांत नव्हता, ज्यावेळीं समितीचें महत्त्वाचें काम पूर्ण झालें होतें त्या शेवटच्या क्षणीं गोविंद पंतांना समितीस मदत

करण्याचें आमंत्रण देण्यांत आलें. समितीला हजर राहण्यांत कोणताच फायदा नाहीं हें बघून पंतांनीं तें आमंत्रण नाकारलें.

इकडे संयुक्त प्रांताच्या कॉंग्रेसनें शेतकऱ्यांच्या मागण्या आणि तत्कालिन तक्रारींचें तथ्यांचें एकत्रीकरण करून, तत्कालिन परिस्थितीचें सम्यक, सूक्ष्म अवलोकन करून आपला एक मसूदा सरकारांस देण्याकरतां तीन सभासदांची एक समिति नेमली. समितीचे अध्यक्ष गोविंद वल्लभ पंत होते. हे सभासद स्व. रफी अहमद किडवाई आणि व्यंकटेश तिवारी होते. ह्या समितीनें परिश्रमपूर्वक एक मोठा अहवाल तयार केला, त्यांत संयुक्त प्रांतांचे शेतकरी आणि शेतीच्या स्थितीचें योग्य निरीक्षण करून आंकडेवारी देण्यांत आली होती, त्यांत नमूद सूचना देखील महत्त्वाच्या आणि अर्थपूर्ण होत्या. म्हणून ह्या अहवालास "पंत–अहवाल" असेंहि म्हणतात.

इ. सन १९३० आणि १९३२ च्या दरम्यान पंतजीनें दोन वेळां तुरुंगवास भोगला. तुरुंगांतून सुटका होतांच राजकारणांतील कार्यक्रमांना कार्य स्वरूप देण्याच्या कामांत दंग झाले. सन १९३१ मध्यें ते पहिल्या प्रथमच अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या कार्यकारिणी सभेचे सदस्य म्हणून निवडले गेले. तेव्हांपासून शेवटपर्यंत ते कार्यसमितीचे सभासद होते. त्याचप्रमाणें सन १९१६ पासून १९६० च्या भावनगरच्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनापर्यंत बहुष: सर्व वार्षिक अधिवेशनाला सहभागी होऊन कॉंग्रेसचे नीती–निर्धार आणि महत्त्वाचे प्रस्ताव लोकापुढें अतर्क्य रीतीनें मांडून सामान्य जनतेच्या गळीं उतरवण्याचा प्रयत्न करीत सन १९१६ ते १९६० पर्यंत झालेल्या सर्वच अधिवेशनांत पंडित पंतांनीं सक्रिय भाग घेतला आणि महत्त्वाच्या प्रत्येक प्रसंगीं

काँग्रेसनीं त्यांचा सल्ला घेतला. संकटसमयीं पंतांनीं ढालीची कामगिरी बजावली आहे. ' गेल्या तीस चाळीस वर्षांत काँग्रेसनें जे महत्त्वाचे निर्णय घेतले त्यांत पंतांचा संयम आणि विवेक दिसून येत असे. ते जसे सहा फूट उंचीचे धट्टेकट्टे, तेजस्वी बुद्धिमत्तेचे अलौकिक व्यक्तित्त्वाचे धनी होते तसेंच कुशाग्रबुद्धि, विशाल हृदय, मदुभावी उदारचरित्र पुढारीहि होते. त्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत अपार श्रद्धा आणि भक्तिभावना घर करून राहिली आहे. पहाडी जनता पंतांना देवतासमान मानत असे. नैनीतालची एक घटना. हें त्याचें उत्तम उदाहरण.

त्या काळीं सर माल्कम हेली नांवाचा एक इंग्रजी अधिकारी संयुक्त प्रांताचा तत्कालिन गव्हर्नर होता. पहाडी प्रदेशांत त्यास ब्रिटीश सत्तेचें प्रतीक मानत असत. नैनीतालच्या वास्तव्यांत तो दररोज घोडचावरून नैनीतालच्या ओढ्या कांठांनीं चक्कर मारत असे. गव्हर्नर येत आहे असें बघून पहाडी स्त्रिया, पुरुष आणि लहान मुलें भिऊन रस्त्याच्या एका बाजूला होत असत. तेव्हा पंतजी पण तेथेंच होते. आपल्या इष्ट मित्रांसमवेत नियमितपणें ते दररोज ओढ्याकांठीं फिरायला जात असत. उंच्यापुऱ्या देहाच्या पंतांना हातांत छडी घेऊन कंपायनमान शरीराचा तोल सावरित हांसत समोरून येतांना बघून पहाडी जनता तत्क्षणीं आदराच्या भावनेनें रस्तावर त्यांना साष्टांग नमस्कार घालून प्रणिपात करीत असे.

सन १९३४ मध्यें अखिल भारतीय काँग्रेस महासमितीची. इतिहासप्रसिद्ध बैठक पाटण्यास झाली. त्यांत मध्यवर्ति असेंब्लीच्या आगामी निवडणुकींत सक्रीय भाग घेण्याचें महात्मा गांधीजींनीं

समर्थन केलें. त्यानुसार केंद्रीय संसदेच्या मंडळाची स्थापना केली गेली. पंतांना त्या मंडळाचे मंत्री बनविण्यांत आलें आणि मध्यवर्ति असेंब्लीची निवडणूक पूर्णपणें जोरानें लढविली गेली. निरनिराळ्या विचारसरणीचे तीन पक्ष निर्माण झाले होते. सरकारनिष्ठ उमेदवार, राष्ट्रीयवादी काँग्रेस आणि स्वतंत्र पक्ष. निवडणुकींत १०० जागांपैकीं ४५ जागेवर काँग्रेस विजयी झाली आणि त्याचें सारें श्रेय पंतांच्या संघटनाकौशल्यास व प्रचारशक्तीस आणि सर्वोत्कृष्ट वाक्चातुर्याकडे जातें. मध्यवर्ति असेंब्लीला-आपल्या असामान्य नेतृत्व आणि प्रमाणभत वक्तव्यानें दिङ्मुग्ध करणारे पंडित मोतीलाल नेहरू, देशबंधु चित्तरंजनदास त्याचप्रमाणें अजेय योद्धा विठ्ठलभाई पटेलांचें देहावसान झालें होतें. म्हणून मध्यवर्ति असेंब्लींत विरोधी पक्षाच्या रूपानें जेव्हां काँग्रेस दलास जबाबदारी पार पाडण्याचा प्रसंग आला तेव्हां त्याचें नेतृत्व देखील प्रतिभाशाली, प्रखर वाक्चातुर्य असलेला आणि तेजस्वी बुद्धिमत्तेच्या व्यक्तिकडे देणें आवश्यक होतें. डॉ. अन्सारींच्या बंगल्यावर काँग्रेस दलाची सभा झाली. दलाच्या नेतृत्वपदीं सी. राजगोपालाचारीनें स्वर्गीय भुलाभाई देसाईंचें नांव सुचविलें. पंतांनीं संमति दर्शविली श्री. देसाई सर्वानुमतें काँग्रेस दलाचे नेता म्हणून निवडले गेले. त्याचप्रमाणें पंतांना दलाचें उपनेतृत्व देण्यांत आलें आणि बॅरिस्टर असफअली, पंजाबचे सध्याचे राज्यपाल श्री. न. वि. गाडगीळ यांना दलाचे सूचेतक म्हणून निवडलें.

पंतांनीं मध्यवर्ति असेंब्लींत विरोधी दलाच्या उपनेत्याच्या जागेवरून चांगल्या तऱ्हेचा दरारा स्थापित केला होता. कायद्यांची उत्तम माहिती आणि त्याचे बारकावे दाखवून आपल्या पक्षाचें

भक्कम समर्थन करतांना बघून सरकारी दल आणि प्रेक्षकवर्ग दंग होऊन जात असे. वादविवादाच्या वेळचें त्यांचें शस्त्र. तथ्यांवरील दांडगा विश्वास आणि ह्या शस्त्रानें ते प्रतिपक्षाला चीत करीत असत. परंतु त्यांचें वैशिष्टच हें होतें कीं, विरोधी पक्षाला विरोध दाखवतांना कठोर वाक्प्रहार आणि उपहास ह्यांचा आश्रय त्यांनीं कधींच केला नाहीं. प्रवाही भाषणामुळें देशांतील सर्वोत्तम आणि सुदक्ष संसद सदस्यांत त्यांची गणना केली जात असे. सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रकार जॉन ग्रंथर त्यांच्याविषयीं लिहितो. "भारताच्या सुयोग्य व्यक्तींपैकीं ते एक आहेत–विशाल काय, शांत आणि मृदुभाषी परंतु वादविवादांत अत्यंत तीक्ष्ण वागी।" सरकारी नीति, कार्यक्रम त्याचप्रमाणें वागणुकीविषयीं चर्चा करतांना विरोधी नेत्याच्या रूपांत मध्यवर्ति लेजिस्लेटिव्ह असेंब्लीला ते भयभीत करीत असत. त्यांत सुद्धां व्हाइसरायच्या शासन परिषदचे सदस्य सर जेम्स ग्रिगला तर ते बागुलबुवासारखे वाटत होते. कारण कीं तेच पंतांच्या तीक्ष्ण वाणीचें आणि कटू उपाहासाचें खाद्य बनत असत. असें ऐकिवांत आहे कीं एकदां सर जेम्सनें असा आदेश दिला होता कीं जेव्हां पंडित पंत असेंब्लींत बोलण्याकरतां उभे राहतील तेव्हां त्यांना ताबडतोब बोलावलें जावें.

मध्यवर्ति लेजिस्लेटीव असेंब्लींत विरोधी पक्ष काँग्रेसच्या उपनेत्याच्या रूपांत त्यांनीं पार पाडिलेली महत्त्वपूर्ण जबाबदारी, दलाची एकवाक्यता सरकारी पक्षाचे कार्यक्रम त्याचप्रमाणें नीतीच्या चिंधड्या उडविण्याच्या अद्‌भुत क्षमतेनें राष्ट्राच्या दृष्टीनें त्यांना सफल आणि यशस्वी सदस्य म्हणून सार्थ केलें होतें. तसेंच सरकारी दलाला त्रास देणारे आणि त्रस्त करणारे! ब्रिटीश सरकारच्या कारावासांतील कालावधि जर सोडून दिला तर एका दष्टीनें सतत

मराठी ग्रंथ सं. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम … वि: …
क्रमांक … नों. दि. …



३८ वर्षेपर्यंत त्यांनीं एक संसद सदस्य या नात्यानें सतत कार्य केलें आहे. मध्यवर्ति असेंब्लींत त्यांचा इतका प्रभाव होता कीं जेव्हां पंत उत्तरप्रदेश विधान सभेंत काँग्रेस दलाचें नेतृत्व करण्याकरतां गेले तेव्हां काँग्रेस संसदीय मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष, लोहपुरुष सरदार पटेल काँग्रेस लेजिस्लेटीव्ह दलाचा मोड करण्याच्या योजनेवर गंभीरतापूर्वक विचार करूं लागले.

★

## : ५ : मुख्यमंत्री पंत

इ. स. १९३५ मध्यें जाहीर झालेल्या इंडिया रिफॉर्म बिलानुसार प्रांतिक स्वायत्ततेचे अधिकार उपभोगण्याच्या हेतूनें सन १९३७ मध्यें काँग्रेसनें एक पक्ष म्हणून निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. हे निर्वाचन भारताच्या सर्व प्रादेशिक घटकांकरतां होतें. यथाकाल मोठ्या जोरांत देशाच्या सर्व भागांत विधानमंडळाच्या निवडणुका झाल्या. उत्तरप्रदेशाच्या विधानसभेकरितां दुसऱ्या काँग्रेस उमेदवारांच्या बरोबर तत्कालीन नेते राजर्षि पुरुषोत्तमदास टंडन, पंत, रफी अहमद क़िडवाई, अजीत प्रसाद जैन, डॉ. कैलासनाथ काटजू, आचार्य संपूर्णानंद, श्री. लालबहादुर शास्त्री आणि विजयलक्ष्मी पंडित हे सर्व उमेदवार म्हणून उभे राहिले. उत्तर प्रदेशांत मोठ्या संख्येनें काँग्रेस निवडून आली. जेव्हां अधिकार ग्रहण करण्याची वेळ आली तेव्हां दलानें पंतांची मध्यवर्ति लेजिस्लेटिव्ह असेंब्लींतील कामगिरी आणि चातुर्यसंघटन लक्षांत घेऊन त्यांनी प्रांतीय विधानसभेच्या काँग्रेस पक्षाच्या नेतेपदीं निवड

केली. ग्रीगनें आपली आंतरिक उत्कट इच्छा प्रकट करतांना खालील प्रमाणें उध्गार काढले, "पंत प्रदेशांत जात आहेत ही माझ्या बाबतींत अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. मला नेहमीं बागुलबुवा-प्रमाणें त्यांची भिती वाटत असे."

विधानमंडळाच्या निवडणुकींत विजय मिळविल्यानंतर देखील काँग्रेसनें अधिकार ग्रहण केलें नाहीं. त्यावेळच्या इंडिया रिफॉर्म बिलांत प्रादेशिक स्वायत्ततेचा समावेश करून प्रशासनास सक्रीय मदत देण्याची संधि जन नेत्यांना लाभली होती. त्यावेळीं गव्हर्नर आणि इंग्रज अधिकाऱ्यांना खास अधिकार देऊन त्यांच्याद्वारें लोक प्रतिनिधींच्या राज्यकारभारांत बऱ्याच अडचणी निर्माण केल्या गेल्या. म्हणून जोंपर्यंत हे अडथळे दूर केले जात नाहींत तोंपर्यंत काँग्रेसनें सत्ताधिकार घेण्याचें नाकारिलें. खूप चर्चा झाल्यानंतर ब्रिटीश सरकारनें मंत्रीमंडळाच्या रोजच्या कारभारांत गव्हर्नरचा हस्तक्षेप होऊं नये म्हणून अधिकार काढून घेतला. काँग्रेसनें सत्तेचा स्वीकार केला. संयुक्त प्रांताच्या पहिल्या लोकनियुक्त सरकारच्या मुख्य मंत्रिपदावर पंतांची निवडणूक झाली.

पंत भारताच्या सर्व प्रांताच्या मुख्यमंत्र्यांत असे पहिले एक मुख्यमंत्री होते, कीं ज्यांनीं प्रादेशिक विधानसभेच्या अध्यक्षपदावर राजर्षि टंडनजींना नियुक्त करून एक नवीनच प्रथा मांडली. आजपर्यंतची परंपरा अशी होती कीं, ज्या कोणा व्यक्तीची निवड अध्यक्षपदासाठीं केली जात असे तिला आपल्या पक्षाचा राजीनामा द्यावा लागत असे,त्याला कारण अस ब्रिटीश कारभारांत अध्यक्षास राज्याचा नि:पक्षीय वरिष्ठ अधिकारी मानण्यांत येत असे आणि मुख्यमंत्र्यास पक्षनिष्ठ ! परंतु टंडनजींनीं ही व्यवस्था अमान्य

केली. त्यांनीं रोखठोक सांगितलें कीं अध्यक्ष म्हणून राहून सुद्धां पक्षीय कार्यांत सक्रिय भाग घेईन. मोठा बाँकाच प्रसंग होता ! कोणताच मार्ग दिसत नव्हता. परंतु पंत जरा देखील निरुत्साही झाले नाहींत. एका ठरावाद्वारें ब्रिटीशसत्तेच्या परंपरेचें उल्लंघन करून त्यांनीं टंडनजींना पक्षीय कार्यक्रमांत सहभागी होण्याची मुभा दिली. पुढें अध्यक्ष या नात्यानें टंडनजींचा विधानसभेचा सारा कारभार राष्ट्रभाषा हिंदींत करण्याचा आदेश दिला तो अंमलांत आणण्याचें श्रेय पंडित गोविंद वल्लभ पंतांना दिलें जातें.

अधिकार ग्रहण केल्यानंतर थोड्याच अवधींत त्यांची राज्य-कारभार करण्याची परीक्षा झाली. ते थोडे सुद्धां खचून न जातां विरोधकांचा पराभव केला. १९३५ च्या ज्या कायद्यान्वयें पंतजींनीं शासनाधिकार घेतले होते त्यांत आय्. सी. एस्.च्या अधिकाऱ्यांना सरळ सरळ भारतमंत्र्यांच्या हातांत सोपवून देण्यांत आलें होतें. देशी मुख्यमंत्री त्यांना पदच्युतहि करूं शकत नव्हता कीं त्यांना बढती देऊं शकत नव्हता. म्हणून आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांना स्वर्ग दोन बोटें उरल्यासारखे झालें. लोकप्रिय मंत्र्यांना वेडे ठरवून त्यांना सेक्रेटरीएटमधून काढून टाकण्याचें स्वप्न ते पाहात होते. परंतु पंतांनीं त्यांचा हा अहंकार कठोरपणें ठेचून टाकला. त्यामुळें त्यांचा अहंकार नष्ट झाला आणि साऱ्या देशांत गोऱ्या अधिकाऱ्यांचें तंत्र विस्कळित होऊन खिळखिळे झालें ही घटना खरोखरीच भारत–प्रजातंत्राच्या इतिहासांत सुवर्णा-क्षरांनीं लिहिण्यासारखी आहे.

आपले माजी अन्नमंत्री श्री. अजितप्रसाद जैन त्यावेळेस पंतांच्या मंत्रीमंडळांतील एक सभासद होते. गोरखपूरच्या कचेरींतील सर-

कारी कागद आणि दप्तर तपासण्याकरतां जेव्हां ते गेले तेव्हां तेथील गोरा अधिकारी त्यांच्या स्वागतासहि आला नाहीं. कीं दप्तर दाखवण्यासहि आला नाहीं. आपल्या अनुपस्थितींत सिटी मॅजिस्ट्रेट असलेल्या भारतीय अधिकाऱ्यास पाठविलें नाहीं तब्येत ठीक नसल्याचें ढोंग केलें. अजीत प्रसादांनीं गोऱ्या कलेक्टरचें गौडबंगाल ओळखलें आणि त्यांत आपला अपमान मानून तपासणी न करतांच दोन्हीं परत गेले. पंतांना जेव्हां ही गोष्ट कळली तेव्हां त्यांनीं सर्वांना मौन पाळण्याचें आणि "वेट अॅन्ड सी" चे आदेश दिले. इकडे गोरखपूरचा गोरा अधिकारी निश्चित होता तोंच मुख्य मंत्र्यांकडून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपदाचा अधिकार ताबडतोब सिटी मॅजिस्ट्रेटला देण्याचा आणि स्वतः देवरिय तालुका एस्. डी. ओ. च्या पदाचा स्वीकार करण्याचा आदेश आला.

ह्रा आदेश मिळतांच जणूं कांहीं त्याच्यावर बॉम्बच पडला. ह्यांत तर उघड उघड गोऱ्या कलेक्टरास पदच्यूत करून त्यास डेप्युटी कलेक्टर बनविलें होतें. इकडे तर आय, सी. ए. अधिकाऱ्यांना असें सांगण्यांत आलें होतें कीं, देशी मिनिस्टर त्यांचें कांहींच वाईट करूं शकत नाहीं. तो गोंधळून संयुक्त प्रांताचे तत्कालिन गव्हर्नर सर हॅरी हेग यांना भेटावयास गेला. श्री. हेग अत्यंत सज्जन स्वभावाचे भले गृहस्थ होते. आणि मंत्रीमंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमांत आपली मदत देत. परंतु पंतांचा अदेशा वाचून ते देखील चकित झाले. त्यांनीं ताबडतोब पंतांना बोलावणें पाठविलें आणि विधानाच्या संरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. उत्तरादाखल पंतांनीं समतोल आवाजांत सांगितलें, "ठीक. विधानानुसार मी त्यांना पदच्यूतहि करूं शकत नाहीं किंवा खालच्या पदावर नेऊं शकत नाहीं. परंतु मी त्यांच्याकडून काम तर करून घेऊं शकतो ! मी कुठें पदाधिकारावरून त्यांना काढलें किंवा त्यांचें

वेतनमान कमी केले आहे ? उलट ज्या तालुक्याची अव्यवस्था आणि अशांति दूर करण्याबाबत स्वत: पी. सी. एस्. देखील अशस्वी झाले अशांत उपद्रवी तालुक्याचा कार्यक्रम सोंपविण्यास योग्य अधिकारी समजून मी त्यांना पाठविलें. ह्यांत घटनेविरुद्ध अशी कोणतीच गोष्ट नाहीं." आणि बाहेर व्हराड्यांत येतात तो गोऱ्या अधिकाऱ्यास पाहून म्हणाले, "माझ्या परवानगीशिवाय आपण गोरखपूरच्या बाहेर आहांत ह्याबद्दल मी जबाब विचारूं शकतो, त्यास उत्तर देण्यास आपण तयार रहावे."

श्री. हेगना असें वाटलें, कीं जणू आपण एका सांपळ्यांत सांपडलों आहोंत. त्यांचीच गोष्ट कशाला सारेच आय्. सी. एस् अधिकारी त्यांत फसले गेले होते. त्यांनी गोऱ्या अधिकाऱ्यास सरळ सांगितलें कीं, एक तर त्यानें पंतांची क्षमायाचना मागावी नाहीं तर सरळ पदाचा राजीनामा देऊन इंग्लंडला निघून जावें. गोरा अधिकारी निरुत्साही आणि उदास होऊन पंताच्या खोलींत गेला तेव्हां फार पूर्वीचा परिचय असल्यासारखें ते त्यांस भेटले. चहा दिला, पाठीवर थोपटल्यासारखें केलें आणि कळस म्हणून हळूच श्री. अजीतप्रसादांच्या खोलीकडे अशा रीतीनें ढकललें कीं. तेथून तो क्षमायाचना करून मगच बाहेर पडला. ह्याचा परिणाम असा झाला कीं, सर्वच इंग्रजी सिव्हिल सर्व्हिसचें दशाकारण झालें, इंग्रजांच्या दुटप्पी धोरणामुळें सांजोरी झालेल्या मुस्लीम लीगचा देखील प्रांतांत विशेष जोर होता. तेथें मुस्लीमचें बहुमत नव्हतें परंतु इंग्रजांच्या पाठबळामुळें त्यांना फारच महत्त्व होतें. प्रत्येक दिवशीं हिंदू-मुसलमानांतील तेढ वाढतच चालली होती. खाकसार नांवाची एक अर्धू लष्करी मुस्लीम संघटना होती. तिचें भीषण अत्याच्यार प्रत्येक गांवीं जोरानें चालले होते. कायदा आणि

व्यवस्थेचा सहज भंग करण्यांत त्यांना फुशारकी वाटे. परंतु पंतांनीं त्यांना देखील नाकदुऱ्या काढावयास लावल्या. वेळ येतांच आपल्या मुत्सद्देगिरीनें त्यांच्यावर मात केली त्या वेळची गोष्ट आहे. देवबंद पेठेंतील मशिदीसमोर कृष्ण लीलेचा कार्यक्रम करज्याण्या प्रश्नावरून हिंदु मुसलमानांतील तेढ चुरसीनें पर्यंत गेली. पंतांनी हें प्रकरण प्रदेशाचें तत्कालिन गृहमंत्री कै. रफी साहेबांच्यावर सोंपविलें. श्री. किडवाई यांनीं परिस्थीचा कानोसा घेतला आणि कृष्णलीला मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणें आपल्या सचिवाकरवी इंग्रजी कलेक्टरच्या नांवानें एक आदेश लिहून पाठविला कीं, ४०० पोलिसांच्या आणि सैनिकांच्या बंदोबस्ताखालीं कृष्णलीलेची मिरवणूक काढावी. रफी साहेबाच्या आदेशाची बातमी जेव्हां पंतांना लागली तेव्हां त्यांनीं त्यांस ताबडतोब बोलावणें पाठविले आणि म्हणाले, "रफो साहेब आपण अधिकाराच्या जोरावर कृष्णलीलेची मिरवणूक काढून द्याल परंतु त्यानंतर तेथें जी जातीयवादाची आग भडकेल त्याचे काय?" रफी साहेबांनीं अत्यंत शांतपणें उत्तर दिलें की, "जे लोक दंगाधोपा करतील त्यांना तुडवून टाकूं."

"ठीक, रफी! आपण सरकार आहांत, आपली संपूर्ण सत्ता उपयोगांत आणून जातीयवादी गुंडांना तुडवूं शकता, परंतु जें देवबंद मुसलमानाचें धर्मस्थान आहे तेथील आग साऱ्या प्रदेशांत धुमसत राहील त्याचें काय?"

"ह्या परिस्थीतींत जें करावयास पाहिजे तेंच करणार. जर त्यांना दडपूं शकलों नाहीं तर ह्या पदाचा त्याग करीन. त्यामुळें दुसरा कोणी त्या ठिकाणीं येऊन तें काम पूर्ण करील." असें म्हणून रफीसाहेब वेगानें आपल्या खोलींत निघून गेले. देवबंदवाला

संबंधीचा आदेश अजूनहि पंतांच्या हातांतच होता. त्यांनीं त्यावर ओझरती नजर टाकली आणि गालांतल्या गालांत ते हंसले.

सन १९३५ च्या कायद्यानुसार प्रथमच निवडल्या गेलेल्या सरकारला प्रत्येक प्रांतांत इंग्रजी अधिकारी आणि गव्हर्नरशीं सामना करावा लागला. धोरणांविषयींचे कलह प्रत्येक दिवशीं चालतच होते. प्रदेशाचा वरिष्ठ अधिकारी गोरा गव्हर्नर आणि जनतेचें प्रतिनिधित्व करणारे मंत्री यांच्यांत मतभेद होणें ही नित्याचीच बाब झाली होती. पंडित पंत देखील त्यांत असत." पंत स्वभावानें जेंवढे कोमल आणि मृदु होते तेवढेच आपल्या कार्यक्रमाबाबत हिमालयाहून अधिक कठोर आणि पाषाणहृदयीं होते, ज्यांच्यावर हिंसक प्रवृत्तींत उठाव करण्याचा आरोप करण्यांत आलेला होता अशा राजबंद्यांना आपल्या राज्यकारभारांच्या काळांत मुक्त करण्याचा त्यांनीं निश्चय केला. भारतमातेच्या सुटकेच्या हेतूनें सशस्त्र क्रांति करणारे हे राजबंदी मुळांत क्रांतिकारच होते. त्यावेळेस " काकोरी प्रकरणानें " देशांत बरीच खळबळ उडवून दिली होती. ब्रिटिश सरकार काकोरी प्रकरणांतील राजकैद्यांना मुक्त करण्यास तयार नव्हतें त्यामुळें सामुदायिकरित्या पंत मंत्रि परिषदेनें अधिकाराचा त्याग केला. प्रांतांत एक घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला. दोघांपैकीं कोणीच माघार घेण्यास तयार नव्हतें. शेवटीं गोऱ्या गव्हर्नर साहेबांस मुख्यमंत्र्यापुढें गुडघे टेकावे लागले. पंतांनीं काकोरी प्रकरणांतील सर्व कैद्यांना मुक्त करून मगच सुटकेचा निश्वास सोडला.

सन १९३१ मध्यें संयुक्त प्रांताच्या कॉंग्रेस समितीकडून पंतांच्या अध्यक्षतेखालीं प्रदेशांतील शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीची पाहणी करण्याकरतां एक समिति नेमण्यांत आली. तिनें कित्येक

दिवस परिश्रम करून एक रिपोर्ट तयार केला. त्यालाच पहिल्या मंत्रीमंडळांत घटनेचें स्वरूप देण्यांत येऊन देशांत जमीन सुधारणा कायदा लागू करण्याचा निर्णय घेण्यांत आला. त्यांत जमीनदारीचें उच्चाटन ही एक महत्त्वाची सुधारणा होती. पदाधिकाराचा स्वीकार करतांना पंडित पंतांनीं कॉंग्रेसच्या मंत्रीमंडळाच्या भावी कार्यक्रमांचा निर्देश करून म्हटलें होतें, "ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण उन्नतीची आणि विकासाची महत्त्वपूर्ण जबाबदारी कॉंग्रेसवर येऊन पडली आहे. देशांत नवयुग आणण्यासाठीं कॉंग्रेस आखाड्यांत उतरली आहे–दीन—दरिद्री आणि वर्षानुवर्षें गुलामीच्या सांखळदंडानें जखडलेल्या जनतेंच्या प्रगतीसाठीं कॉंग्रेसनें ही सारी जबाबदारी उचलली आहे. आतां वेळ येतांच आपल्या सर्वांना त्या गोष्टी करून दाखवावयाच्या आहेत." पंतांनीं आपल्या मुख्य मंत्रीपदाच्या कालावधींत सर्वांत आधि इटावा प्रांतांत सामुदायिक विकास योजनेचें तत्त्व लागूं करून सामुदायिक विकास योजनेचा श्रीगणेशा केला. आज देशांत सामुदायिक विकास योजनेचें जें मोठें जाळें पसरलेलें दिसतें त्याच्या मागें, पंडित पंतांची प्रेरणाच काम करीत आहे.

पंतांचे आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे बारीक लक्ष असे. त्यांनीं घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी वेळ न दवडतां होत असे, ह्याविषयीं श्रीमती नयनतारा सैगलनें एके ठिकाणीं लिहिलें आहे:—त्या वेळीं माझी आई, अर्थात् विजयालक्ष्मी पंडित पंतमंत्रिमंडळाच्या सभासद होत्या. म्हणून अधूनमधून मी देखील सेक्रेटरिएटमध्यें जात असें. तेथें रद्दी कागद टाकण्यास टोपली नसल्यामुळें फाटके कागद व सटरफटर वस्तूंचा एक मोठाच ढीग लागत असे. ही गोष्ट पंतांच्या कानांवर घालण्याचा

विचार मी करीत होते. तसं पाहिलं तर मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंतांचें आमच्या घरीं मी कित्येकदां स्वागत केलें होतें. परंतु सरकारी दृष्टीनें त्यांना पत्र लिहिणें ही एक निराळीच गोष्ट होती. म्हणून भीत भीत, कचरत आईची मदत मागितली. तिनें प्रोत्साहन दिल्यावर जरा कचरतच मोजक्या ओळींत मी माझी तक्रार लिहून पंतांना कळविली आणि त्यांना सेक्रेटरिएट-मध्यें रद्दी टाकण्यासाठीं टोपल्या ठेवण्याची विनंती केली. आणि विशेष म्हणजे माझ्या पत्राप्रमाणें ताबडतोब व्यवस्था करण्यांत आली.

पंतांची स्मरणशक्ति दांडगी होती, आपल्या मताच्या पुष्टचर्थ हातांत कोणतेंहि पत्र किंवा टांचण न ठेवतां ते घटनांची आणि आंकड्यांची जंत्री देत असत. त्यामुळें कट्टरांतील कट्टर विरोधी देखील त्यांच्याशीं सहमत होत असे. त्यांचे निकटचे स्नेही देखील आश्चर्यचकित होत असत. भारताचे अर्थमंत्रि आणि कुशल प्रशासक श्री. मोरारजी देसाईनीं कै. पंतजींना श्रद्धांजलि वाहतांना लोकसभेंत म्हटलें, " ह्या भारताचे लोहपुरुष सरदार पटेलानंतर पंडित पंतांची कमतरता या गृहास व सरकारला नेहमींच जाणवेल. ते सामर्थ्याचे आधारस्तंभ होते. देशाकरतां त्यांनीं केलेल्या सेवेचें विस्मरण कधींहि होणार नाहीं आणि त्यांची बरोबरी करणारा विरळाच! त्यांनीं आपलें सारें आयुष्य राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरतां वेचलें आणि राष्ट्राचा उत्कर्ष करण्यासाठीं आपले प्राण पणास लाविले. आपल्या विरुद्ध मतें असलेल्यांशीं देखील ते अत्यंत प्रेमळपणें वागत असत आणि त्यांच्या सर्व गोष्टी ध्यान देऊन ऐकून घेत. मनांत कोणाविषयीचें किल्मिष अथवा किंतु निर्माण न होऊ देणें हा त्यांचा स्वभाव

होता. त्यांचा कट्टर विरोधक देखील त्यांच्याकडे आदर आणि सन्मानानें पहात असे. चुकून देखील ते आपल्या अडचणींची वाच्यता दुसऱ्याजवळ करीत नसत, सार्वजनिक कार्याची किंवा देशसेवेची त्यांनीं कधींच बढाई मारली नाहीं.

सन १९३९ मध्यें अचानक युद्ध उद्भवलें. साऱ्या जगांत खळबळ उडाली. भीति आणि घबराटीचें वातावरण निर्माण झालें. नाझी राष्ट्र आणि मित्र राष्ट्र स्वातंत्र्य आणि मानवाच्या मूलभूत हक्कांच्या नांवाखालीं एकमेकांच्या जिवावर उठली. तसं पाहिलं तर हें युद्ध युरोपच्या युद्धभूमीवर चाललें होतें; भारताचा त्याच्याशीं कांहींच संबंध नव्हता. परंतु ब्रिटननें भारतीय जनतेचा सल्ला न घेतांच आपल्या बरोबर भारताला युद्धांत ओढलें. भारतीय पुढारी चकितच झाले. युद्धांत भाग न घेण्याची त्याची इच्छा होती. परंतु इंग्रज त्याचा विचारहि करण्यास तयार नव्हते. म्हणून महात्मा गांधी व काँग्रेसनें ब्रिटीश सत्तेस मदत करावयाची नाहीं असें ठरविलें. प्रत्येक प्रांताच्या मंत्रिमंडळानें पदत्याग केला आणि सर्वजण विधायक कार्यास लागले. इंग्रज सरकारच्या विरुद्ध लोकांत रोष पसरला. निरोधनें, हरताळ, पिकेटिंग, सभा आणि संम्मेलनांनीं देशांत उत्साहाची लाट उसळली. ब्रिटिश सरकारच्या रागास पारावारच राहिला नाहीं. धरपकड, लाठीहल्ला आणि गोळीबाराचें सत्र सुरू झालें. ब्रिटिश सरकारनें सर्वांत आधीं पंतांना पकडून तुरुंगांत टाकलें. यापूर्वीं त्यांनीं १९३० आणि १९३२ सालीं दोनदां तुरुंगवास भोगला होता.

सन १९४१ मध्यें सर स्टेफर्ड क्रिप्सच्या आगमनाच्या वेळीं त्यांच्याबरोबर देशी पुढाऱ्यांची जी मुलाखत होणार होती त्यांत

पंतांनीं सक्रिय भाग घ्यावा म्हणून त्यांना मुक्त करण्यांत आलें. परंतु विचारविनिमय व मुलाखती घेऊन देखील क्रिप्स कमिशन अयशस्वी झालें. कोणताच निकर्ष निघाला नाहीं. म्हणून महात्मा गांधींनीं ब्रिटिश सत्तेविरुद्ध युद्ध करण्याची घोषणा केली. मुंबईला ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांतच अखिल भारतीय कॉंग्रेस महासमितीची संकटकालीन जरुरीची सभा बोलावण्यांत आली. तत्कालिन कॉंग्रेसाध्यक्ष कै. मौलाना अबुल कलाम आजादांच्या नेतृत्वाखालीं कार्यसमितींत पूज्य बापूजीनीं "चलेजाव"ची घोषणा प्रस्तुत केली. त्यावेळेस भाषण करतांना त्यांनीं भारतीय जनतेला आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं "करो या मरो"चा बहुमूल्य संदेश दिला. दुसऱ्या दिवशीं महासमितीच्या अधिवेशनांत हा प्रस्ताव मांडला जाणार होता. ब्रिटिश सत्ता खडबडून जागी झाली. ज्यामुळें ब्रिटिश सत्तेचा पाया पोकळ होऊन ती नामशेष होईल अशा एका भयंकर वणव्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. ह्यांत ब्रिटिश साम्राज्याचा प्रचंड वटवृक्ष देखील ढांसळण्याची शक्यता होती. वणव्यास थोपवून धरण्याकरतां सरकारीं यंत्रणेचीं चाकें भराभरा फिरूं लागलीं. सरकारनें रातोरात मौलाना आझाद, पंडित जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी आणि पंत इत्यादि कार्यसमितीच्या सर्व सभासदांना पकडून एका अज्ञात ठिकाणीं पाठवून दिलें. लोकांना त्यांचा पत्ता देखील लागला नाहीं. सन १९४२ च्या भारत स्वातंत्र्य चळवळीचें सूतोवाच येथूनच झालें. त्यावेळेपासून ३१ मार्च १९४५ पर्यंत पंत देशांतील अनेक थोर पुढाऱ्यांबरोबर अहमदनगरच्या किल्ल्यांत नजरबंदींत होते. लॉर्ड व्हेवेल व्हाइसरॉय झाल्या-

नंतर नियोजित सिमला परिषदेच्यावेळीं इतर पुढाऱ्यांबरोबर त्यांनाहि मुक्त करण्यांत आलें.

सन १९४६ च्या द्वितीय निवडणुकीच्या वेळीं देशांतील इतर प्रांतांप्रमाणें उत्तरप्रदेश विधानसभेकरितां कॉंग्रेसचे उमेदवार बहुसंख्येनें निवडून आले. ह्यावेळीं देखील कॉंग्रेसनें सर्वानुमतें पंतांना नेता म्हणून निवडलें. नव्या मंत्रिमंडळाची स्थापना करून पंतांनी प्रांताच्या कारभाराचीं सूत्रें हातांत घेतलीं आणि राष्ट्राच्या विकासाकरितां निरनिराळ्या योजनांची रूपरेखा आंखून त्याप्रमाणें काम केलें.

शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति सुधारण्याच्या हेतूनें सन १९३९ मध्यें पंतांनीं 'यू. पी. टेनेंसी ॲक्ट' विधानसभेंत पास करून घेतला होता. त्याप्रमाणें शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसास सहज सेक्युरेट मिळत असे. नजरभेट आणि वेठमजुरी बेकायदेशीर ठरविली गेली होती. शेतकऱ्यांची धरपकड आणि कैद यांना पायबंद घालण्यांत आला. परंतु पंत मंत्रिमंडळानें पदत्याग करतांच सरकारनें ह्या सर्व सवलती बंद केल्या होत्या. म्हणून १९४६ च्या निवडणुकीनंतर प्रांताच्या नवीन मंत्रिमंडळानें विधानसभेंत नवीनच धोरण जाहीर केलें. "ज्या जमिनदारी प्रथेमुळें शेतकरी आणि राष्ट्र यांच्यामध्यें मध्यमवर्गीय येतात, त्या प्रथेचें समूळ उच्चाटन करण्याचा विधानसभेंचा निर्धार आहे, आणि मध्यम वर्गीयांच्या हक्काचा उपयुक्त मोबदला ठरवून त्यांचे तमाम हक्क काढून टाकण्याच्या कामाकरितां सरकारनें एक योजना आंखण्याच्या उद्देशानें एक समिती स्थापन करावी."

शेतकऱ्यांचें रक्षण करण्याच्या उद्देशानें मंत्रिमंडळानें उचललेलें हें पाऊल महत्त्वाचें आणि क्रांतिकारक होतें. मुख्यमंत्र्यांच्या

नेतृत्वाखालीं २५ सदस्यांची समिति नेमण्यांत आली. समितीनें प्रकाशित केलेल्या प्रश्नावलीचीं उतरें आणि साक्षीदारांच्या साक्षी घेतल्या. नंतर ३ जुलै १९४४ मध्यें आपला अहवाल तयार केला. ह्याचाच अधार घेऊन सरकारनें सन १९४९ मध्यें ' उत्तर प्रदेशीय जमीनदारी उन्मूलन विधेयक " सादर केलें होतें. तेव्हां पंडित पंत विधानसभेंत म्हणाले, " ह्या विधेयकांत आम्ही सर्व वर्गांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. धरती पिकविणारे सुखी राहोंत, त्यांचें शोषण न होवो हीच आमचीं इच्छा! " पुढें ह्याच विधेयकाचें रूपांतर होऊन सन १९५१ पासून तो कायदा राष्ट्रांत सर्वत्र अंमलांत आला. ह्या कायद्यामुळें शेतकऱ्यांचे विविध ४० प्रकार बंद होऊन फक्त दोनच प्रकार बाकी राहिले, " भूमिधर आणि आसामी ! " 'टुकडेबंदीमुळें शेतकऱ्यांची शेती लहान लहान दोन तुकड्यांत विभागली न जातां एकाच ठिकाणीं केंद्रित झाली. उत्तर प्रदेशांतील ह्या रक्तहीन क्रांतीचें सारें श्रेय पंडित पंतांनाच दिलें जातें. ह्याखेरीज प्रांतांत कालवे, पाटबंधारे आणि बीजोत्पादना करितां मोठमोठीं सुरक्षित जागेचीं जाळींच पसरविलीं गेलीं. प्रांतांत शिक्षण, समाजकल्याण, हरिजनकल्याण, आदींच्या योजनेवर अधिक लक्ष देण्यांत येऊं लागलें. त्यामुळें प्रदेश, जनता आणि समाज दिवसेन् दिवस प्रगतिपथावर चढत गेला.

ह्याच कालावधींत सन १९४७ मध्यें भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळें ज्या घटनापरिषदेची स्थापना झाली त्याचे सदस्य म्हणून पंतांची निवड झाली. सन १९४६ च्या जुलैपासून सन १९४७ च्या १५ ऑगस्टपर्यंत भारताच्या राजकारणांत ज्या क्रांतिकारक घटना घडल्या त्यांत पंतांनीं सक्रिय भाग घेतला होता. घटनापरिषदेच्या निरनिराळ्या उपसमित्यांना पंतांनीं चांगलीं

मदत केली आणि चाललेल्या कामाच्या गतीस अधिक वेंगवान बनविलें. परंतु त्यांचें मुख्य काम सल्लागाराचें होतें. तत्त्व आणि व्यवहाराच्या उभ्या आडव्या धाग्यांनीं नव भारताचे महावस्त्र तयार करावयाचें होतें, त्यांत सोय, शोभा आणि संरक्षण तिन्हींची आवश्यकता होती. ह्या दृष्टीनें सरदार वल्लभभाई पटेल त्याचप्रमाणें पंडित गोविंद वल्लभ पंतांनीं व्यवहाराचें क्षेत्र बलवत्तर बनविलें. संविधान तयार करतांना अधिक प्रश्न, अनेक अडचणी आणि मति गुंतवून टाकणारे प्रसंग उपस्थित झाले आणि ते सोडविण्यांत पंतांनीं त्याचप्रमाणें सरदार पटेलांनीं अधिकांत अधिक भाग घेतला. घटनेच्या अनेक शिल्पकारांपैकीं प्रमुख शिल्पकाराच्या रूपांत पंतांचा उल्लेख इतिहास निःसंदिग्धपणें आणि गौरवानें करील.

★

## : ६ : लोकनेते पंत

स्वातंत्र्यापूर्वींच्या आणि नंतरच्या सर्वच प्रसंगांच्या वेळीं काँग्रेसच्या प्रत्येक कार्यक्रमांत पंतजींनीं सक्रिय भाग घेतला. त्यांची प्रखर बुद्धिमत्ता, अलौकिक प्रतिभा आणि तर्कशुद्ध विचारसरणीबद्दल गांधीजींना देखील आदर असे, गांधीजी ज्या व्यक्तींशीं सल्लामसलत करीत, त्यांत गोविंद वल्लभ पंत यांचा समावेश होता. परिस्थितींत मेरूप्रमाणें अचल राहून, विरोधकांना चारीमुंड्या चित करणारे सरदार वल्लभभाई पटेलांनंतरचे लोहपुरुष पंतच होत. वेळ येतांच काँग्रेसची ढाल बनण्यास ते मागें पुढें पहात नसत हरिपुरा काँग्रेस नंतरच्या

त्रिपुरा काँग्रेसच्या वेळीं जो फुटीरपणा निर्माण झाला होता त्यांस पंतांनींच थोपवून धरिलें आणि त्यामुळें काँग्रेस पुन्हां पूर्वींप्रमाणें सशक्त बनली.

सुभाषचंद्र बोस हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या कार्यकुशल आणि तेजस्वी बुद्धिमत्तेच्या जोरावर राष्ट्रीय काँग्रेसरूपी नौकेस इच्छित स्थळीं पोंहचविण्याच्या कामीं खूपच श्रम घेतले. त्यामुळे त्रिपुरा अधिवेशनाचें अध्यक्षस्थान पुन्हां सुभाषबाबूंनांच द्यावें असे म्हणणारा एक गट काँग्रेस महा-समितींत होता. सुभाषबाबूंनीं आपली मान्यता देऊन पुढील वर्षाच्या योजना आंखण्यास सुरुवात केली. त्यांनीं राष्ट्रीय - योजना - निर्माण समितीची स्थापना केली आणि त्याच्या प्रधानपदीं पंडित जवाहर-लाल नेहरूंची योजना केली. परंतु तत्कालीन राजकीय परिस्थिति आणि ब्रिटीशांच्या कुटिल राजकारणाला निकरानें तोंड देण्याकरितां पूज्य बापूजी काँग्रेसचें अध्यक्षपद एखाद्या राष्ट्रीय मुसलमानास देऊं इच्छित होते. आणि मौलाना आझादच्या रूपानें त्यांना राष्ट्रीय मुसलमान मिळाला देखील ! म्हणून आसाम प्रदेशाच्या बारदोली नगरांत झालेल्या कार्यसमितीच्या बैठकींत अधिकृतरित्या मौलाना आझादांच्या उमेदवारीची घोषणा झाली. परंतु एका बंगाली उमेदवाराशीं दुसऱ्या बंगाली उमेदवारानें प्रतिस्पर्धा करणें चांगलें नाही असा विचार करून मौलाना आझादांनीं आपली उमेदवारी मागें घेतली: आणि सुभाषबाबू आपले प्रतिस्पर्धी डॉ. पट्टाभि सितारामैयांचा पराभव करून पुन्हां निवडून आले. डॉक्टर पट्टाभि रामैयांचा पराजय म्हणजे स्वत:चा पराजय होय अशी महात्मा गांधींनीं घोषणा केली. त्यामुळें देशांत खळबळ उडाली. ज्या प्रतिनिधींनीं सुभाषबाबूंचें समर्थन केलें होतें ते उघड

उघड गांधींजींचें समर्थन करूं लागले. कायसमिती व महासमितीचें बहुमत गांधीजींच्या बाजूनें होतें. काँग्रेसच्या इतिहासांत हें एक अभूतपूर्व संकट होतें. राष्ट्रीय नेतृत्वांत दुही पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. सुभाषबाबूंच्या पुढें त्यामुळें मोठीच अडचण उपस्थित झाली. राजकोटमध्यें चाललेल्या चळवळीमुळें त्रिपुरा येथील अधिवेशनाला गांधीजी हजर राहूं शकले नाहींत तरी त्यांच्या व्यक्तित्त्वावरील विश्वास प्रकट करण्याच्या हेतूनें इतर प्रतिनिधि बहुसंख्येनें हजर होते. अ. भा. काँग्रेस महासमितीमध्यें पंतप्रधानांनीं वार्षिक अहवालाचा स्वीकार केल्यानंतर पंडित गोविंद वल्लभ पंतांनीं महासमितीच्या १६० सभासदांच्यातर्फे एका प्रस्तावासंबंधीं सूचना दिली. "गेल्या कांहीं वर्षांपासून संस्थेनें आपला समग्र कार्यक्रम महात्मा गांधींच्या ज्या नीति-तत्त्वांच्या आधारानें आंखला होता त्या नीतितत्त्वांसंबंधीं महा-समिती आपला विश्वास प्रकट करीत आहे. त्याच बरोबर महासमिती अशी घोषणा करीत आहे कीं, त्या नीतितत्त्वांत कधींच अंतर पडून चालणार नाहीं आणि पुढें देखील काँग्रेसचा कार्यक्रम ह्याच तत्त्वांनुसार आंखला जावा. महासमिती कार्य-कारिणी सभेच्या कामाविषयीं आपला विश्वास प्रकट करीत आहे. पुढल्या वर्षीं बिकट परिस्थिति निर्माण होण्याचा संभव आहे; अशा वेळीं फक्त महात्माजीच देशास आणि काँग्रेसला विजयाच्या मार्गावरून नेऊं शकतील. म्हणूनक गांधीजींच्या संमतीनेंच अध्यक्ष महाराजांनीं कार्यसमिती निवडावी अशी त्यांना विनंती करण्यांत येत आहे." पंडित पंतांचें म्हणणें लक्षांत येतांच महासमितींत एकच गोंधळ माजला. प्रत्येक प्रतिनिधि

आपल्या पक्षाचें जोरदार समर्थन करूं लागला. सुरत काँग्रेसचें दृश्य ह्याहि ठिकाणीं साकार झालें.

अतिशय गोंधळ माजल्याकारणानें जवळजवळ एक तासभर महासमितीनें कांहींच काम केलें नाहीं. शरतबाबूंच्या विनंतिनुसार सर्वत्र शांतता निर्माण झाल्यानंतर काठीचा आधार घेत पंत परत व्यासपीठावर आले आणि भरदार आवाजांत म्हणाले,

" महात्मा गांधींच्या नेतृत्वाशिवाय देशाची आणि काँग्रेसची प्रगति होणें शक्य आहे काय? पूज्य बापूंच्याशिवाय कार्य करण्यास कोण समर्थ आहे?" पंडित पंतांच्या तर्कशुद्ध बोलण्याचा इतका प्रभाव पडला कीं विरोधकांचा विरोध हतबल झाला. सर्वानुमतें त्यांचा प्रस्ताव पास करण्यांत आला. अशा प्रकारें त्रिपुरा काँग्रेसच्या वेळीं काँग्रेसरूपी नौकेला, राष्ट्रीय संकटाच्या खवळलेल्या सागरांतून सुखरूप, सुव्यवस्थित पैलतीरी लावण्यास पंतांनीं एकट्यांनींच आपल्या हातांचा आधार दिला.

सन ११४५ मध्यें ब्रिटिश सत्तेनें लॉर्ड वेव्हेल नांवाच्या एका राजकारणी तज्ञाची नेमणूक भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून केली. सन १९४२ ची चळवळ छिन्न विछिन्न होऊन विस्कळित झाली होती. मोठमोठे नेते बंदिवासांत पडले होते आणि कांहीं लोक भूमिगत राहून लपून छपून चळवळ करीत होते. असंतोष आणि अशांततेचा अग्नि आणखी धुमसूं नये म्हणून सरकारनी समझोत्याचें धोरण स्वीकारलें होतें. त्याचप्रमाणें लॉर्ड व्हेवेलच्या अंतःकरणांतहि भारताच्या स्वातंत्र्याविषयीं थोडीशी सहानुभूति होती म्हणून हिंदु-मुसलमान "प्रश्न सोडविण्यास आणि भारताच्या स्वातंत्र्यासंबंधीं साधक बाधक चर्चा करण्यास एखादी सर्वमान्य योजना आंखण्याच्या हेतूनें त्यानें सिमल्यास भारताच्या राजकीय

पक्षांचें व नेत्यांचें संमेलन बोलाविलें. ह्यावेळीं देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न लवकरांत लवकर सोडविण्याकरितां देशाच्या दोन मोठ्या राजकीय-पक्षांनीं—काँग्रेस व मुस्लिम लीगनें एकत्र येऊन एखादी योजना आंखल्यास बरें होईल असा विचार करून कांग्रेसनें गोविंद वल्लभ पंतांना आपला प्रतिनिधि म्हणून श्री. महंमद अली जिनांशीं विचारविनिमय करण्यास पाठविलें. परंतु बऱ्याच विचारविनिमया-नंतरहि मुस्लिम लीगचे पुढारी बॅरिस्टर जिना आपली पाकि-स्तानाची योजना सोडण्यास तयार झाले नाहींत. त्यामुळें सिमला परिषदेंत संयुक्तरीत्या कोणतीच योजना बनली नाहीं आणि पुढें भारताचे दोन तुकडे झाले.

सिमला परिषद अयशस्वी झाली तरी देखील महात्मा गांधींनीं धैर्य सोडलें नाहीं. कुठल्याहि परिस्थितींत देशाचे दोन तुकडे करण्यास ते तयार नव्हते. म्हणून स्वत: जिनांच्या मुलाखतीस मुंबईस आले. द्विराष्ट्र सिद्धांत मुस्लिम लीगनें सोडून द्यावा म्हणून त्यांनीं जिनास खूप समजाविलें. परंतु व्यर्थ ! 'पालथ्या घड्यावर पाणी !' ब्रिटिश घटनेनें निर्माण झालेल्या भारतीय घटना-समितीवर बहिष्कार टाकून व पाकिस्तान दिन साजरा करून श्री. जिना आणि त्यांच्या मुस्लिम लीगनें समेटाचीं सर्व दारें बंद केलीं. मग तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड माउन्टबॅटननें देशाच्या विभागणींची आपली योजना काँग्रेस आणि मुस्लिम लीग समोर ठेवली. या योजनेच्या प्रसिद्धीनें देशांत खळबळ उडाली. निरनिराळे नेते निरनिराळ्या व्यासपीठावरून आपलीं मतें मांडू लागले, पट्टीच्या काँग्रेस नेत्यांनीं देशाच्या विभागणीस तीव्र विरोध दाखविला व कडक टीका करून आपला विरोध दर्शविला. या विभागणीबाबत वरिष्ठ काँग्रेस पुढाऱ्यांत मतभेद निर्माण झाले.

१०८७७

कै. मौलाना आझाद, पूज्य महात्मा गांधी, राजर्षि टंडन यांनीं देश विभागणीस सक्त विरोध केला. नेहरू, पटेल, कृपलानी यांना भारताच्या पूर्ण स्वातंत्र्याचा दुसरा कोणताच मार्ग न दिसल्यामुळें अनिच्छेनें त्या योजनेचा स्वीकार करावा लागला. तरी सुद्धां व्हाइसरायानें सादर केलेल्या विभागणीच्या योजनेला अखिल भारतीय कॉंग्रेस महासमितीची अनुमति मिळविणें जरूर होतें.

त्याप्रमाणें १४ जून १९४७ ला दुपारीं दिल्लींत कॉंग्रेस महासमितीची भारतभाग्य निर्णायक अशी इतिहासप्रसिद्ध बैठक तत्कालीन अध्यक्ष आचार्य कृपलानींच्या अध्यक्षतेखालीं सुरू झाली. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, जयप्रकाश नारायण, राजाजी आदि सर्व पट्टीचे नेते बैठकीस हजर होते. आचार्य कृपलानींच्या प्रास्ताविक विवेचनानंतर पंडित गोविंद वल्लभ पंतांनीं कार्यसमितीकडून तयार केल्या गेलेल्या " माऊन्टबॅटन योजना " संबंधींचा प्रस्ताव विचाराकरितां मांडला. प्रस्तावाचा आशय असा होता:–
" महासमिती, आपल्या मागील निश्चयानुसार ब्रिटीश सरकारच्या पुढील ऑगस्टपर्यंत सर्व शासनाधिकार भारताच्या हातीं सोंपविण्याच्या निर्णयाचें स्वागत करीत आहे. गेल्या सहा महिन्यांपासून ब्रिटीश मंत्रिमंडळाच्या योजनेनुसार निर्माण झालेली घटना सभा कार्यमग्न आहे. सर्व भारतीयांची स्वतंत्रता आणि योग्य वेळीं संधि देण्याच्या मूलभूत सिद्धांतावर स्वतंत्र भारतीय संघाची योजना बनविण्यांत तिनें बरेंच काम केलें आहे. परंतु मुस्लिम लीगनें घटना समितिवर टाकलेल्या बहिष्कारांमुळें निर्माण झालेल्या विरोधाकडे लक्ष देऊन कॉंग्रेस आपल्या धोरणानुसार देशाच्या कोणत्याहि

क्षेत्रांतील लोकांचा आपल्या घोषणेनुसार व सर्वांच्या इच्छेच्या विरुद्ध भारतीय संघांत समाविष्ट होण्यास भाग पाडणार नाहीं. कॉंग्रेस महासमिति ३ जूनच्या घोषणेंतील प्रस्तावांचा स्वीकार करीत आहे.

३ जून १९४७ च्या प्रस्तावाच्या अनुरोधानें देशाचे कांहीं भाग भारतापासून अलग होतील. ही घटना जनक असून सुद्धां चालू परिस्थितींत अखिल भारतीय कॉंग्रेस महासमिती ह्या घटनेचा स्वीकार करून देशद्रोही त्याचप्रमाणें समाजद्रोही शक्तीशीं प्रबल सामना करून स्वतंत्र भारत आणि त्याच्या स्वातंत्र्याचें संरक्षण, संवर्धन आणि संघटन करण्यासाठीं कॉंग्रेसीयांना कंबर कसण्याचा आदेश देत आहे."

त्यांनीं आपल्या ठरावाचें जोरदार समर्थन केलें. ते म्हणाले, "देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचा हाच एक मार्ग आहे. कॉंग्रेसनें मुस्लिम लींगशीं समेट करण्याचे अनेक प्रयत्न केले, श्री. जिनांशीं समेट करण्याचा प्रयत्न केला. कॉंग्रेस कार्य-कारिणीनें आपल्या मार्चच्या ठरावानें मुस्लिम लीगला परामर्श करण्याकरितां बोलाविलें होतें. देशासंबंधीं विविध कायदे बनविण्यास, लीग सदस्यांनीं सहायता द्यावी यांकरितां घटना सभेनें त्यांस अनेक वेळा आमंत्रणें दिलीं. परंतु लीगनें ह्या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष केलें. कॉंग्रेसनें शेवटच्या क्षणापर्यंत एकी टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु ते सर्व प्रयत्न फोल ठरले. आजची स्थितिच अशी आहे कीं आपण एकतर ३ जूनच्या वक्तव्याचा स्वीकार केला पाहिजे किंवा आत्महत्त्या तरी केली पाहिजे."

पंडित पंतांच्या ठरावाचें समर्थन करतांना गांधीजी म्हणाले, " वास्तविक मी ह्या ठरावाचा विरोधक आहे. परंतु कधीं कधीं विरोधी निर्णयहि मानावे लागतात. मुळांत ब्रिटिश सरकारची ही योजना सदोष आहे. परंतु आपण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपणास ह्या मातींतून सोनें निर्माण करावयाचें आहे. कांहीं प्रसंगीं वाईटांतूनहि चांगलें निघूं शकतें." ठरावाच्या विरुद्ध सर्वांत तर्कशुद्ध व युक्ति संगत भाषण टंडन यांनीं केलें. ते म्हणाले, आज आपण गुरुदेव रवींद्रनाथांच्या वंदेमातरम गीतांत वर्णन केलेल्या भारतमातेचे दोन तुकडे करावयास निघालों आहोंत. तिच्या मुक्ततेकरितां गेल्या अर्धशतकांत अनेकांनीं हंसत हंसत आपल्या प्राणांची आहुति दिली आहे, परंतु आज तिचे दोन तुकडे करण्या-शिवाय दुसरा कोणताहि मार्ग दिसत नाहीं. पण विधिलिखित कोणी टाळूं शकत नाहीं हेंच खरें.

भारत स्वतंत्र झाल्याबरोबर पंतांनीं संयुक्त प्रांतांत आदेश दिला कीं येथून पुढें प्रांतिक सरकारचा सर्व कारभार देवनागरी लिपींत चालेल. आजपर्यंत सरकारी कारभार आणि गॅझेट उर्दु भाषा व फारशी लिपींत निघत असे. पंत पहिल्यापासून हिंदी भाषा व देवनागरी लिपीचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रभाषा हिंदीची त्यांनीं अमोल सेवा व उन्नति केली. कांहीं काळ ते काशी नागरी प्रचारिणी सभेचे अध्यक्ष देखील होते. त्यांच्या नेतृत्वकालांत सभेची भरभराट झाली आणि हिंदी भाषा व साहित्य यांच्या विविध योजना अमलांत आल्या. त्याचप्रमाणें संयुक्त प्रांतांतील एक ज्येष्ठ शिक्षण संस्था काशी विद्यापीठाच्या स्थापनेबाबत गुप्तांच्या बरोबर पंतांनीं देखील फार मोठी सहायता केली.

जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत विद्यापीठाच्या प्रत्येक बाबतींत ते लक्ष देत असत.

सन १९५० मध्यें राष्ट्रीय योजना कार्य समितीचे एक सदस्य म्हणून पंतांची नेमणूक झाली. तेथें ते शेवटपर्यंत काम करीत होते.

★

## : ७ : गृहमंत्री पंत

सरदार पटेलांच्या मृत्यूनंतर दृढ विरोध, स्पष्टवक्तेपणा, दूर-दर्शीपणा, कार्यनिपुणता व त्याचप्रमाणें श्रेष्ठ चारित्र्य आणि तीक्ष्ण वाक्चातुर्याच्या सहाय्यानें पं. नेहरूंना प्रभावित करणारी कोणतीच व्यक्ति भारताच्या राजनीतिक क्षितिजावर अथवा काँग्रेसमध्यें दृष्टीस पडली नाहीं. सर्वत्र अभावात्मक वातावरण पसरलें होतें. नेहरूंना राहून राहून एकलेपणाची जाणीव होत होती. प्रत्येक क्षेत्रांत आधारभूत झालेल्या, मौलाना आझाद, डॉक्टर राजेंद्रप्रसाद, राष्ट्रसंत विनोबा, डॉक्टर विधानचंद्रराय, आचार्य कृपालानी, जयप्रकाश नारायण, डॉक्टर कैलासनाथ काटजू आदि व्यक्ति आज सुद्धां हयात आहेत. परंतु त्या सर्व व्यक्ति निरनिराळ्या जबाब-दारीच्या क्षेत्रांत काम करण्यांत मग्न होत्या किंवा विरोधी पक्षांत समाविष्ट होत्या. म्हणून राज्यकारभार आणि संघटनेच्या क्षेत्रांस एका दुसऱ्या व्यक्तीची निःसंशय आवश्यकता होती. गेल्या कांहीं दिवसांपासून सगळीकडून श्रेष्ठ व्यक्ति म्हणून पंतांचें नांव पंडित नेहरूंच्या कानांवर येत होतें. त्याचप्रमाणें सन १९५४ च्या डिसेंबर-मध्यें ते मध्यवर्ति सरकारमध्यें गृहमंत्र्याच्या महत्त्वाच्या जागेवर त्यांची नेमणूक केली. आंतरिक सुरक्षितता व सुव्यवस्थेची जेवढी

जबाबदारी पंतांच्या खांद्यावर होती. तेवढीच आंतरराष्ट्रीय धोरणा-संबधाचे ज्येष्ठ सल्लागार व मार्गदर्शक म्हणूनहि होती.

मध्यवर्ति मंत्रालयाची जबाबदारी संभाळीत असतांना पंतांच्या-वर अनेक अवघड प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पडूं लागली. देशांत अशांततेचीं लक्षणें दिसत होतीं. भाषावार आणि प्रादेशिकतेचे प्रश्न निर्माण झाले होते. नेफा प्रांतांत फिजोनें उघड विरोध केला होता. ह्या सर्व प्रश्नाचा निकाल ताबडतोब लागणें जरुरीचें होतें. पंतांच्या अगदीं जवळच्या मित्रास देखील त्यांनीं ह्या बाबतींत कोणत्या दिशेनें पाऊल टाकलें हें सांगणें कठीण आहे.

पंतांनीं हळूहळू केंद्रीय राज्यकारभारांत गृह–मंत्रालयास एक महत्त्वाचें स्थान प्राप्त करवून दिलें. आसाम, केरळ आणि काश्मिरसारख्या बिकट प्रश्नांसंबंधीं त्यांच्या स्पष्ट व मजबूत धोरणामुळें ह्या मंत्रालयास एक वेगळेंच महत्त्व प्राप्त झालें, १९५५ च्या मध्यास मध्यवर्ती सरकारच्या राज्यसरकार बाबतच्या धोरणांत बदल दिसून येऊं लागला. हा बदल म्हणजे गृह-मंत्र्याच्या सुधारलेल्या विचारांचा परिपाक होय. त्यामुळें राष्ट्रीय ऐक्य वाढीस लागलें.

गृह मंत्रालयानें सुरुवातीलाच नाग प्रदेशांतील अराजकता नष्ट करण्याच्या हेतूनें कडक धोरण अवलंबिलें. त्याबद्दल खूप चर्चा झाली. परंतु हळूं हळूं नवीन धोरणाचे इष्ट परिणाम दिसूं लागले. तेथील कारभाराच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्यांत आली आणि लौकरच स्वतंत्र नाग राज्याची स्थापना करण्यांत आली.

त्याच वेळीं राज्यांच्या परस्परविरोधी, प्रादेशिकता व भाषावार प्रांतरचनेंच्या प्रकरणींचा निकाल लावण्याचें महत्त्वाचें काम

४

मराठी ग्रं... स्थळप्रत.
अनुक्रम ... वि. ...

पंतांवर येऊन पडलें. त्यावेळीं भाषावर प्रांतरचना करणारी समिती स्थापन केली गेली. समिती स्थापून त्याबाबत पंत म्हणतात, "आर्थिकदृष्ट्या स्थिर, त्याचप्रमाणें भौगोलिक व सांस्कृतिक दृष्टींनें सजातीय राज्यांची स्थापना आणि भावनात्मक ऐक्य निर्माण करण्याचें काम समितीवर सोपविण्यांत आलें आहे. समितीनें एका वर्षांत आपला अवहाल सादर केला. त्यानंतर, महिन्याभरांत पंतांनीं देशांत भावनात्मक ऐक्य निर्माण करण्यासाठीं अहर्निश प्रयत्न केले. त्यांनीं ज्या दक्षतेनें १९५६ मध्यें राज्य पुनर्रचना कायदा लोकसभेंत पास करून घेतला त्याची सर्वत्र प्रशंसा करण्यांत आली.

परंतु हा कायदा मंजूर करून घेणें जितकें सोपें होतें तितकें त्यास कार्यरूप देणें अवघड होतें. त्या निमित्तानें पुन्हां एकदां पंतांचें चातुर्य दिसून आलें. पंत केवळ सिद्धांतवादी किंवा कल्पनेच्या भराऱ्या मारणांरापकीं नव्हते. दृढनिश्चयी आणि अटल होते. द्विभाषी मुंबई राज्याचे गुजरात आणि महाराष्ट्र असे दोन भाग करण्यांत पंतांचा प्रामुख्यानें हात होता.

राज्य पुनररचना समितीनें देशांत क्षेत्रीय विभाग स्थापन करावे. अशी शिफारस केली होती. त्या सर्व विभागाचें अध्यक्षपद त्यांनीं स्वतः स्वीकारलें होतें.

दरवर्षीं राजधानींत भरणाऱ्या राज्यपालांच्या संमेलनांत चर्चिल्या जाणाऱ्या औपचारिक गोष्टींना तिलांजली देऊन त्यांना वरच्या पातळीवर आणून राज्यकारभारांतील गंभीर प्रश्नांचा विचार करावयास लावण्याचें महत्त्वपूर्ण काम पंतांनीं केलें.

केरळमधील साम्यवादी राज्य व्यवस्थेमुळें निर्माण झालेले प्रश्न समाधानकारकपणें सोडविणें हें त्यांच्या चिरंतन कार्यांपैकीं एक

होय. जर दुसरा कोणी असतां तर कदाचित् केरळच्या चित्र-विचित्र राज्यकारभारास अडथळे आले असते. परंतु पंतांसारख्या निश्चयी व्यक्तीनें स्थिती ओळखली आणि लौकरच केरळचें साम्यवादी कुशासन अस्त पावलें.

गृहमंत्री झाल्यावर देखील पंतांची कामगिरी केवळ आपल्या मंत्रालयापुरतीच मर्यादित राहिली नाहीं. त्यांनीं काश्मिरबाबतच्या धोरणास एक नवीनच वळण लावलें. १९५५ मध्यें श्रीनगर येथें भाषण करतांना ते म्हणाले, "काश्मिरचें भारतीय संघांतील विलिनीकरण अपरिवर्तनीय आहे. विलिनीकरणाच्या समयीं भारतानें कांहीं गोष्टींचें आश्वासन दिलें होतें. परंतु त्यावेळेपासून आजपर्यंत स्थितींत खूप फरक पडला आहे. गेल्या सातआठ वर्षांत पुष्कळच घटना घडल्या आहेत." त्यांच्या ह्या भाषणामुळें त्यांच्या काश्मीरच्या रहिवाशांत सुरक्षितपणाची भावना वाढीस लागली.

राष्ट्रभाषेचे तर ते आधारस्तंभ होते. राष्ट्रभाषा समितीनें केलेल्या शिफारशीवरून तयार केलेला संसदीय समितीचा रिपोर्ट त्यांच्या कुशल व्यक्तित्वाचा निदर्शक आहे. त्यांच्या प्रयत्नामुळेंच हिंदी १९६५ पासून राजभाषा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गृहमंत्री असतांना कधीं कधीं त्यांना जनतेस किंवा विरोधी पक्षास न आवडणाऱ्या परंतु जनतेच्या हिताचे कायदे करतांना ते मजबूत पुरावे देत असत, सरदार पटेलांप्रमाणें विरोधी पक्षास पंतांची दहशत नव्हती. त्यांना पंतांचा बागुलबोवा कधींच वाटला नाहीं. वेळप्रसंगीं पंत त्यांना सौम्य शाब्दिक मार देत असत. राज्यपुनर्रचनेची आणि भाषावार प्रांतरचनेची जबाबदारी पंतावर येऊन पडली, पंजाबचें उदाहरण अपवाद म्हणून सोडून दिलें तर पंत सर्व अग्निदिव्यांतून यशस्वी रीतीनें बाहेर पडले.

म्हणून सन १९५७ मध्यें राष्ट्राध्यक्षांनीं त्यांना "भारतरत्न" असा किताब देऊन पंतांचा गौरव केला. परंतु ते नेहमीं म्हणत कीं, "माझा सर्वांत मोठा किताब म्हणजे माझा तीन वेळचा तुरुंगवास होय."

काँग्रेसचे निरनिराळे गट, उपगट व विविध विचारांत समन्वय स्थापित करून त्यांत एकसूत्रीपणा आणण्याची कठीण कामगिरी पंतांनाच करावी लागली. नागपूर काँग्रेसच्या वेळची गोष्ट! समाजवादी दिशेनें पाऊल पुढें टाकण्याच्या दृष्टीनें काँग्रेसनें सहकारी शेती आणि शेतीविषयक नवीन बिल करण्याची घोषणा केली तेव्हां काँग्रेसपक्षांत विरोधाचें वादळ माजलें. कित्येकजण सहकारी शेती आणि नवीन शेती सुधारणांच्या विरोधी होते. परंतु पंतांनीं त्यांतूनहि मार्ग काढला आणि पक्षांत निर्माण झालेले मतभेद मिटविले, पंतांच्या घरीं कोणीहि केव्हांहि जाऊं शकत होता. त्यांत कित्येकजण त्यांच्याच विरुद्ध तक्रार घेऊन येत. त्यांचें म्हणणें पंत धीरानें आणि मनोनिग्रहानें ऐकून घेत. एकदां काँग्रेस पक्षांतील त्यांच्याच एका सहकाऱ्यानें तब्बल एक तास आपली तक्रार पंतांना ऐकविली. त्याल वाटलें कीं, पंत कंटाळून गेले आहेत. म्हणून मध्येंच निराश होऊन तो थांबला. पंतांनीं तो थांबला आहे असें पहातांच म्हटलें, "कां थांबलात हो? तेव्हां त्याला फारच आश्चर्य वाटलें.

गृहमंत्री झाल्यानंतर शेवटपर्यन्त अविश्रांत कष्ट घेऊन राष्ट्रीय गुंतागुंतीचे दैनिक प्रश्न सोडविण्यांत मग्न असत. शेवटचे कित्येक दिवस त्यांची तब्येत ठीक नव्हती तरी देखील ते १८ ते २० तास रोज काम करीत असत. गेल्या वर्षींचीच गोष्ट! २१ एप्रिल १९५९ ला त्यांना हृदयविकाराचा पहिला झटका

आला. डॉक्टरांनीं पूर्ण विश्रांति आणि कामाचा भार कमी करण्याचा सल्ला दिला. पण तो त्यांनीं मानला नाहीं. तरुणांना देखील लाज वाटावी इतके श्रम ते करीत असत. हिमालयाच्या अंगाखांद्यावर खेळल्यामुळें त्यांना पहाडी शरीराची आणि अमर्याद शक्तीची देणगी मिळाली होती. अतिशय कष्ट करूनहि त्यांच्या भव्य चेहऱ्यावर थकल्याभागल्याची खूण दिसत नसे, ते अल्पहारी होते. सकाळच्या वेळीं चहाच्या एका कपाखेरीज ते कांहींही घेत नसत. दुपारच्या जेवणात मुख्यत: फळें आणि उकडलेल्या भाज्यांचा समावेश असे. रात्रीं ते सात्विक आहार घेत. पंतांचे श्रम आणि त्यांची अल्पहारी वृत्ति बघून त्यांचे मित्र आणि सहकारी आश्चर्यानें तोंडांत बोटें घालीत. त्यांनीं आपल्या जीवनांत पंतप्रधानांच्या "आराम हराम है" ह्या घोषणेस मूर्तस्वरूप दिलें होतें. सन १९५९ मध्यें ते हृदयविकारानें आजारी पडले तेव्हां हिंदीचे युगकर्ते कवि पद्मभूषण श्री. सुमित्रानंद पंतांनीं त्यांना रोज नियमितपणें एक तास विश्रांति घेण्याची आग्रहपूर्वक विनंति केली. तेव्हां ते म्हणाले, "विश्रांतीची काय गरज आहे ? काम करणें म्हणजे विश्रांति घेणें होय. जर मानव काम करूं शकत नसेल तर व्यर्थ जीवनाचा भार वाहून काय फायदा ? माझी तर अशी इच्छा आहे कीं लोकसभेंत बोलत असतांनाच मला मरण यावें.

आणि झालें तसेंच ! २० फेब्रुवारी १९६१ सोमवार रोजीं लोकसभेंत पंत दिवसभर काम करीत होते. राष्ट्रपतींच्या भाषणावर नेहरूंनी केलेलें वक्तव्य ऐकण्यासाठीं दुपारीं ते राज्यसभेंत आले. साम्यवादी सदस्य श्री. भूपेश गुप्तांच्या भाषणावर त्यांनीं एक प्रश्न देखील उपस्थित केला होता आणि तें सुद्धां

उभे राहून ! सामान्यपणें शरीर कम्पनामुळें ते नेहमीं बसूनच भाषण करीत असत. त्यानंतर भाषणाचें प्रत्युत्तर देण्याकरतां आवश्यक त्या नोंदी करण्याच्या उद्देशानें ते आपल्या निवासस्थानीं परत आले. दमले असतांनाहि पर्वा न करतां ते नोंद तयार करण्याच्या कामास लागले. पण थोडचाच वेळांत त्यांना असें दिसून आलें कीं नोंद तयार करणें अशक्य आहे. तेव्हां त्यांनीं कायदामंत्री श्री. अशोक सेन यांना बोलाविणें पाठविलें. श्री. सेन आल्यानंतर आवश्यक तें टिपण करून घेत असतांनाच एकाएकीं आपल्या पहाडी आवाजांत ते कांही तरी बोलले आणि डोळचा-पुढें अंधारी येत असल्याचें त्यांनीं सांगितलें. थोडा वेळ डोळे बंद करून बसले तेव्हां कुठें पुढच्या टिपणास सुरुवात झाली. परंतु त्याचवेळीं त्यांचा आवाज बसला आणि डोळचांत लाली आली. श्री. सेन यांनीं सर्व परिस्थिति ओळखली, पण त्या-पूर्वींच पंत बेशुद्ध झाले होते. नंतर हीच अवस्था मृत्युपर्यन्त टिकून होती. देशांतील सुप्रसिद्ध चिकित्सक व हृदयरोग तज्ञ बंगालचे मुख्य मंत्री डॉ. राय आणि एक रशियन चिकित्सक यांनीं त्यांची तपासणी केली. परंतु सर्वच व्यर्थ ठरलें. त्यांची अवस्था अधिकाधिक चिंताजनकच झाली. एखाद्यावेळीं मधूनच तब्बेत सुधारण्याचीं चिन्हें दिसत. परंतु दिवा विझण्यापूर्वींच्याप्रमाणें ज्योत मोठी होऊन प्रकाशते आणि शेवटीं नामशेष होते त्याच-प्रमाणें झालें. आणि ७ मार्चच्या दिवशीं पहाटे भारतीय स्वातंत्र्य-संग्रामांतील दुर्दम्य, अजिक्य योद्धा, आधुनिक भीष्म, पंडित नेहरूंचे प्रियमित्र आणि उजवे हात पंडित गोविंद वल्लभ पंत चिरनिद्राधीन झाले. राष्ट्राचा एक आधारच ढांसळला. एक तेजस्वी ज्योति मृत्युच्या प्रचंड झंझावातानें विझून गेली.

पंतांनीं आपल्या आयुष्यांत कधींहि हार खाल्लीं नाहीं. हातांत घेतलेलें प्रत्येक काम त्यांनीं तडीस नेलें. उत्तर प्रदेशांत ज्या नवीन सुधारणा आणि योजना झाल्या त्याचें सारें श्रेय पंतांनाच आहे. राज्यकारभारासंबंधींचे निर्णय ते नेहमीं अत्यंत सावधगिरीनें घेत असत. म्हणून त्यांना विरोधी पक्षाशीं सामना करतांना कधीं माघार घ्यावी लागली नाहीं. त्यांच्याविषयीं एका ब्रिटिश गव्हर्नरानें लिहिलें आहे—पंत राजकारणांत हत्तीसारखें सावधगिरीनें चालतात. एक पाय सुरक्षित जागीं भक्कम रोवल्यानंनरच दुसरा पाय पुढें टाकतात."

दिल्लीच्या राज्यकारभारांतील अस्थिरता, अनिश्चितता आणि शिथिलतेसारख्या वाईट गोष्टींचा यथाकाल नाश करण्याचें महत्त्वाचें काम सरदार पटेल व श्री. सी. राजगोपालाचारी यांच्या नंतर पंतांनींच केलें. ह्यासंबंधीं उल्लेख करतांना एका प्रजासमाजवादी सभासदानें म्हटलें आहे, "दिल्लीची राज्यव्यवस्था ढांसळण्याच्या अवस्थेंत असतांना त्यांत थोड्या प्रमाणांत कां होईना जो स्थिरतेचा अंश सांपडतो त्याचें सारें श्रेय गृहमंत्री पंडित पंतांनाच द्यावें लागेल.

★

## : ८ : पंत कांहीं संस्मरण

पंडित पंत शिकत असतानाच त्यांचा विवाह झाला होता. पहाडी लोकांत लहानपणींच विवाह करण्याच्या रीतीरिवाजापासून पंत देखील सुटले नाहींत. आणि जेव्हां ते अलाहाबादच्या म्योर सेन्ट्रल कॉलेजांत होते तेव्हां ते पिता

देखील झाले होते. म्हणतात ना विधिलिखित कांहीं वेगळेंच असतें. त्याप्रमाणें पहिल्या संततीचें दर्शन घेण्यापूर्वींच ती संतती त्यांना सोडून निघून गेली. कांहीं काळानंतर पत्नीचाहि अकस्मित मृत्यु झाला. कालांतरानें दुसरा विवाह झाला. परंतु ती पत्नीदेखील लौकरच जग सोडून निघून गेली. नंतर तिसऱ्या पत्नीपासून एक मुलगा आणि दोन मुली झाल्या. त्यांनीं आपली मुलगी राधादेवीचा विवाह अत्यंत साधेपणानें केला. आणि जनतेकडून किंवा सरकारी अधिकारी वर्गाकडून कोणत्याहि-प्रकारचा आहेर किंवा भेट स्वीकारली नाहीं.

पंतांच्या पत्नी एका साध्या कुटुंबांतील आहेत. त्यांना कधींहि कोणी सार्वजनिक सभा-सम्मेलन अथवा परिषदेंत पाहिलें नाहीं. पंतांचें सुख हेंच आपलें सुख आणि त्यांचें दुःख हेंच आपलें दुःख असे त्यांना वाटे. पंतांचे चिरंजीव डॉक्टर कृष्णकांत पंत आणि त्यांचे जांवई श्री. पांडे लोकसभेचे सदस्य सभासद आहेत.

आपल्या कुटुंबांतील मंडळींबरोबर नेहमीं संबंध ठेवणाऱ्या सार्वजनिक पुढाऱ्यांत पंतांची गणना केली जाते. सामान्यपणें सार्वजनिक कार्य करणाऱ्या लोकांना कौटुंबिक जीवन नसतें. त्याला नेहमीं काम करावें लागतें, प्रवास करावा लागतो आणि निरनिराळ्या ठिकाणीं जावें लागतें. परंतु पंतांनीं सार्वजनिक जीवन जगत असतांना व आपल्या कुटुंबियांत असतांना देहत्याग केला. पंतांना मुलांबद्दल अतिशय प्रेम होतें. मुलें म्हणजे देवाचीं फुलें असें त्यांना वाटे. त्यांच्या घरीं त्यांच्या भोंवतीं मुलांचा गराडा असे.

पंतांच्या सहनशक्तीची आणि गंभीरतेचें अनेक उदाहरणें आहेत. सन १९४१–४२ मध्यें त्यांना एक विषारी गळूं झालें.

डॉक्टरांच्या मतें शस्त्रक्रिया करणें फार जरूरीचें होतें नाहींतर सर्व शरीरांत विष भिनण्याची शक्यता होती. पंतांच्या संमतीनें शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यांत आला. गुंगी येण्याकरता क्लोरोफॉर्मसाठींही पंतांना विचारलें. तेव्हां ते ताड्कन म्हणाले, " क्लोरोफॉर्म हुंगण्याची कांहीं जरूर नाहीं. मी सर्व सहन करीन." आणि आपल्या डोळ्यांदेखत शस्त्रक्रिया चालू असतांना ते जरूरहि डगमगले नाहीत. किंवा चेहऱ्यावर वेदनेची छटा देखील दिसली नाहीं. शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांना कांहीं त्रास होतो कां म्हणून विचारल्यावर ते गंभीरतेनें म्हणाले, "तें तर प्रत्येकाच्या आत्मसामर्थ्यावर अवलंबून आहे. जर जखमेबाबत आपण विचारच केला नाहीं तर दु:ख कोठून होणार ? "

अवघड प्रसंगांतहि मानसिक स्थिरता ढळूं न देणें आणि न रागवणें हा पंतांचा महान आणि दुर्लभ गुण होता. पंतांच्या निकट सान्निध्यांत जाणारी प्रत्येक व्यक्ति त्यांची भव्य आणि सौम्य मूर्ति पाहून त्यांची उग्रता विसरून जाई. पंतांच्या समेटाच्या वृत्तीनें आणि रामबाण पुराव्यानें विरोधकाचा रोष नाहींसा होत असे. सन १९३७–३९ मध्यें विजयालक्ष्मी पंडित पंत मंत्रीमंडळाच्या सदस्य होत्या. एकदां कोकत्या तरी गोष्टी-वरून त्या अतिशय रागावल्या आणि पंतांना स्पष्ट सांगण्याकरतां त्यांच्याकडे गेल्या. परंतु त्यांच्याकडे जातांच एका अद्भूत शक्तीनें त्या भारल्या गेल्या आणि त्यांचा राग पार नाहींसा झाला. त्या परत आपल्या ऑफिसमध्यें परत आल्या. विजया-लक्ष्मी पंडित वरील प्रसंगाचा उल्लेख करून म्हणतात, " कित्येक वेळां रागावून मीं त्यांच्या ऑफिसमध्यें गेले. परंतु त्यांची फुला-सारखी हंसरी मुद्रा आणि समुद्रासारखी गंभीरता पाहून मी

आल्या पावलीं परतत असे. माझा राग क्षणार्धांत निघून जाई. पंत गोडगोड बोलून इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत आणि मी, माझ्या रागाचें मूळ कारणच विसरून जाई."

पंत अतिशय मनमिळाऊ होते. ते आपल्या मित्रांना आणि सहकाऱ्यांना मार्गदर्शन करीत व सल्ला देत. वेळ प्रसंगीं ते त्यांना जरूर ती मदतहि करीत. सायमन कमिशनच्या वेळेस घडलेल्या घटनेनंतर पंतांनीं नेहरु कुटुंबांत आपलें एक विशिष्ठ स्थान निर्माण केलें होतें. कै. मोतीलाल नेहरु आणि पूज्य महात्मा गांधींच्या मृत्युनंतर पंत नेहरु कुटुंबाचे एकमेव सल्लागार आणि हितचिंतक होते. पंतांच्या मृत्युमुळें नेहरु आणि त्यांच्या कुटुंबास मोठा धक्का बसला. त्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे काँग्रेसच्या माजी अध्यक्ष श्रीमती इंदिरा गांधींनीं शोकांजलि वाहतांना प्रकट केलेल्या भावना ! "पंतांच्या देहावसानामुळें निर्माण झालेल्या आघाताच्या बाबतींत मी माझी मानसिक प्रक्रिया सांगण्यास असमर्थ आहे." पंतांचें निधन म्हणजे आमच्या कुटुंबास वज्राघात होय. त्यांच्या मृत्युमुळें राष्ट्राचें जें नुकसान झाल आहे तें कधींहि भरून निघणार नाहीं.

"फुफकारो पर काटो मत" असें धोरण आसणाऱ्यांपैकीं पंत एक होते. सन १९४८ मध्यें देशाच्या कानाकोपऱ्यांतून पसरलेल्या जातीय दंगलीची झळ आग्र्यास देखील पोहचली. प्रांताचे उपगृहमंत्री श्री. जगनप्रसाद जैन रावत त्या दिवशीं तेथेंच होते. त्यांनीं पोलिस सुपरिंटेंडेंट आणि कलेक्टर यांना सांगितली "तीन तासांत हा उपद्रव शांत झाला पाहिजे. तुम्हांला माझी पूर्ण परवानगी आहे, तसेंच पकडलेल्या व्यक्तीस सोडून द्याच. अशी शिफारस कोणी घेऊन आला तर त्यालाहि अटक करावें.

आणि खरोखरच उपद्रव कांहीं तासांतच कमी झाला. परंतु शिफारस करणाऱ्या कांहीं स्थानिक काँग्रेशी पुढाऱ्यांनाहि हुकुमाप्रमाणें अटक करण्यांत आली. लोक धांवतच रावतांकडे आले त्यांनीं त्यांस धाक दाखवला. तक्रारी पंतांच्या कानापर्यंत पोहचल्या. ते रावतजीना म्हणाले, " हें तुमचें क्षेत्र आहे आणि, तुम्हीं कामहि चांगलें करतां परंतु एक गोष्ट ध्यानांत ठेवणें कांहींहि केलें तरीं शेवटीं चार गोड शब्द बोलत जा. "

सरकारी नोकरांनीं प्र ासत्ताकाच्या परम्परेस नेहमीं जपलें पाहिजे. ह्या गोष्टींवर पंतांनीं आपल्या जीवनांत विशेष भर दिला. कोणत्याहि पक्षाच्या किंवा व्यक्तीच्या दडपणाखालीं न येतां सरकारी धोरणाचें पालन करणें त्यांचे कर्तव्य आहे.

पंतांचें खाजगी जीवन फारच थोड्या लोकांना माहित होतें. कारण पंत प्रसिद्धिपराङमुख होते. त्यामुळें देशाबाहेर भारताच्या या आधुनिक भीष्माचें नांव ओळखणाऱ्यांची संख्या बोटावर मोजण्याइतपत होती. त्यांनीं आपल्या जीवनग्रंथाचीं रहस्यात्मक पानें फक्त कांहीं मित्रांनाच वाचून दाखविलीं. एकदां त्यांनीं आपलें अगदीं जवळचे मित्र कैलासनाथ काटजूंना पत्रांत लिहिलें, " जीवनाला विशेषत: माझ्या जीवनास मी कोणतेंहि महत्त्वाचें स्थान देत नाहीं. जीवनाचा भार माझ्यावर अनिच्छेनें लादला गेला आहे असें मात्र मी म्हणत नाहीं. वास्तविक मृत्युलोक म्हणजे ब्रह्मदेवानें निर्माण केलेला एक प्रचंड कारावास आहे. त्याच्यापासून सुटका होण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे मृत्य असे वद्धलोक नेहमीं म्हणतात त्यांत कितपत सत्य आहे हें मला माहित नाही. जीवन म्हणजे काय, जीवनाचें अंतिम मल्य काय आहे ह्या गोष्टीबाबत मी पूर्ण

अज्ञानी आहे. परंतु एका सत्याचा आविष्कार मात्र मला झाला आहे. चुका आणि कार्यतत्परतेचा अभाव यांस जीवनांत विशेष महत्त्व नाहीं. परंतु गति, शक्ति आणि कार्य हींच जीवनाची मूलभूत तत्वें आहेत. जोंपर्यंत मी कार्यशील राहीन, लोकांना मदत करूं शकेन आणि लोकांच्यावर माझा भार पाडणार नाहीं तोंपर्यंत जीवन जगणें मला आवडेल. परंतु परोपजिणं मात्र मला लज्जास्पद वाटेल. जेव्हां अशी स्थिति होईल तेव्हां त्याच क्षणीं मला मृत्यु येवो अशी विनंति मी परमेश्वरास करीन. "

निधनापूर्वीं पंतांनीं जें शेंवटचें पत्र लिहिलें तें कै. पंडित मोतीलाल नेहरुंच्या जन्मशताब्दीच्या उत्सवाच्या वेळचें आहे. त्यांनीं हें पत्र आन्ध्रप्रदेशचे मुख्यमंत्री श्री. दा. संजीवैया यांना लिहिलें होतें. त्यांत आन्ध्रप्रदेशांत शताब्दि समारंभाच्या तयारी संबंधीं जी तयारी झाली होती त्याविषयी लिहिलें होतें. पंत मोतीलाल नेहरूंच्या जन्मशताब्दि समारंभाचें उपाध्यक्ष होते.

पंतांच्या मृत्यूनें देशाचें अपरिमित नुकसान झालें आहे. परंतु पंतप्रधान पंडित नेहरूंचें मात्र व्यक्तिगत नुकसान खूप झालें आहे. ज्याच्या बरोबर ते संपूर्ण विश्वासानें सल्लामसलत करूं शकतील असे त्यांच्या पिढीपैकीं कोणीच शिल्लक राहिलें नाहीं. नाही म्हणायला राजेंद्रबाबू आहेत. परंतु अनेक गोष्टींसंबंधीं दोघांत मौलिक मतभेद आहेत. पंतांसंबंधीं असें म्हटलें जातें कीं नेहरूशीं त्यांचा कधींच मतभेद झाला नाहीं आणि जर कधीं झाला तर त्यांनीं आपल्या मतास गौण स्थान देऊन नेहरूंचें अनुकरणें केलें. सायमन कमिशनच्या विरुद्ध निदर्शनें करतांना पंतप्रधान नेहरूंवर होणारे वार स्वतःच्या शरीरावर आजतागायत निष्ठापूर्वक तें त्यांनी पार पाडले. पंत नेहरूंचे केवळ एक मित्रच नव्हे तर पुनः कधींहि मिळणार नाहीं असे सहकारी व साथी होते.

**– समाप्त –**

# श्रद्धांजलि

पंडित पंतांच्या देहावसानामुळें व्यक्तिगतरीत्या फक्त माझीच नव्हे तर सर्व भारताची हानि झाली आहे. आम्हीं दोघें गेल्या ३५ वर्षांपासून मित्र आणि सहकारी होतो. २१ वर्षांपूर्वी एका चळवळीचें नेतृत्व करीत असतांना जेव्हां घोडेस्वार पोलिसांनीं निर्दयतेनें मारहाण केली तेंव्हां त्यांनी स्वतः ढाल बनून आमचें रक्षण केले.

विलक्षण प्रतिभा असलेले पंत भारताची एक विशेष व्यक्ति होती. ज्यांचा तोल कधींच जाऊं शकणार नाहीं अशा व्यक्तींपैकीं ते एक होते.

—पंडित जवाहरलाल नेहरू.

श्री. गोविंद वल्लभ पंतांच्या देहावसानानें मला अत्यंत दुःख होत आहे. नुकतीच मी त्यांना दिल्लींत भेटले होतें. भारताचा हा असामान्य नागरिक आणि अमूल्य साथीदार निघून गेल्यावद्दल माझ्या अंतःकरणपूर्वक दुःख संवेदनाचा स्वीकार व्हावा.

—महाराणी एलिझाबेघ.

दीर्घकालापर्यंत सतत मृत्युशीं झगडत असतांना अखेर शेवटीं पंतांना हार खावी लागली. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनीं राष्ट्राची धुरा वाहिली देशांकरितां लढत असतांना ते इहलोक सोडून गेले म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाहीं, त्यांचा शरीरविहित आत्मा आपल्यांत राहून भारतांत शेंकडों वीर तयार तयार करीत राहील यांत शंका नाहीं.

—डॉक्टर विधानचंद्र राय, मुख्यमंत्री बंगाल.

पंडित पंतांच्या मृत्युमुळें केवळ भारताचीच नव्हे तर जगांतील प्रत्येक व्यक्तीची दुःखद हानी झाली आहे, जीं व्यक्ति त्यांना व्यक्तिगतरित्या ओळखत होती किंवा स्वातंत्र्य संग्रामाच्या काळांत ज्यानीं त्यांचीं उत्कृष्ट कामगिरी पाहिली असेल. स्वतंत्र भारनांत त्यांनी ज्या भूमिकेवरून काम केलं त्याचेशीं प्रत्येक व्यक्ति परिचित होती.

—श्री एल्सवर्थ बंकर, माजी अमेरिकन रांजदूत

पंतांच्या मृत्युमुळें भारतानें आपला एक प्रमुख उपासक गमावला. नेहरूंना तर एक अमूल्य सहकारी गमवावा लागला. माझ्या सरकारची आणि ब्रम्ही जनतेची अंत:करणपूर्वक वेदनांचा स्वीकार करण्यांत यावा.

——ऊ. नू. प्रधानमंत्री ब्रम्हदेश.

श्री गोविंद पंतांच्या दुःखद मृत्युमुळे भारताची कधीं न भरून येणारी हानी झाली आहे. ते सगळयांचें स्फूर्तिस्थान आणि संकटसमयीं योग्य मार्गदर्शन करणारे होते.

——डॉ. तुलसीगिरी नेपाळ गृहमंत्री.

पंडित पंत दृढ आणि धैर्यवान होते, त्यांच्या मृत्युमुळें भारताची घातक हानि झाली आहे.

——श्रीं. मैत्रीपाल सेनानायक–स्वराष्ट्रमंत्री श्रीलंका.

पंतांची सत्यनिष्ठा आणि इमानदारी याविषयीं शंका होणेंच शक्य नव्हतें. त्यांचें विचार व निर्णय निश्चित असत. देशसेवा हीच त्यांची महत्त्वाकांक्षा होती.

साम्यवादी, जातीयवाद, व खोडसाळ सर्वजण लोक त्यांच्या वाक् शक्तींला भिऊन होते. परंतु आज हे सर्वजण त्यांच्या मृत्युमुळे दुःखी झाले आहेत.

—दि टाइम्स लंडन सुप्रसिद्ध दैनिक पत्र.

आपले पूज्य आणि लोकप्रिय नेते पंडित पंतांच्या मृत्यू-मुळे ब्रम्हदेशच्या भारतवासियांना फार दुःख झाले. आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यांत सर्वांत जास्त शूर व निडर सेनापतींच्या यादींत पंतांचें नांव पहिलें राहील.

—श्री. बरजोरजी–अध्यक्ष अ. ब्रम्हदेश भारतीय काँग्रेस.

(९) पंत भारतांच्यां महान जनकापैकीं एक होते. त्यांच्या मृत्युमुळें जी हानी झाली आहे त्याची पूर्तता कधींहि होऊं शकणार नाही.

—श्री. अनंत शयनम् आयंगार, अध्यक्ष, भारतीय संसद.

एक तळपणारें नक्षत्र नाहींसें झाले. पंतांच्या मृत्यूनें भारत दीन झाला. त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता होती. मला कठीण प्रसंगीं नवा मार्ग दाखवीत असत.

—श्री. संजीव रेड्डी, काँग्रेसाध्यक्ष.

ह्या दुःखद प्रसंगीं सार्‍यांची संवेदना नेहरूंच्या बरोबर आहे. पंतांच्या रूपानें पंतप्रधानांना एक विश्वासू साथीदार आणि बुद्धिवान् सल्लागार मिळाला होता. त्यांस आज त्यांना मुकावें लागलें.

—श्री. उछरंगराय ढेबर, माजी कॉ. अध्यक्ष

मला असें वाटतें कीं जणुं माझा भाऊच काळानें हिरावून नेला आहे. मी खूप दिवस आजारी असून मृत्यूची वाट पहात आहे. पंत माझ्यानंतर खूप दिवसांनीं आजारी झाले. परंतु निर्याण करण्यांत मात्र त्यांनीं पुढें पाऊल टाकलें.

—रार्जषि टंडन, माजी कॉंग्रेसाध्यक्ष.

पंतांसारख्या त्याग आणि सेवेच्या उच्चासनांवर विराजमान झालेल्या व्यक्तीला मृत्यू कधीं स्पर्श करूं शकत नाहीं. उलट आपल्या कार्यरुपी सुमधुर सुवासामुळें ते अमर राहतील.

—कार्डिनल वेलेरियन मुंबई

आमचे लाडके नेते निघून गेले ते श्रेष्ठ देशभक्त, मार्गदर्शक आणि संसदीय विशेषज्ञ होते. प्रत्येकाकरितां त्यांच्या-जवळ योग्य मार्ग आणि गोड बोल होते.

—आचार्य कृपालानी, विरोधीपक्ष नेते.

देशाचे महान् अनुभवी नेते, पंत इहलोक सोडून गेले. एक पोकळी निर्माण झाली, ती हानि भरून येणें अशक्य आहे. मोठमोठ्या आकांक्षा असलेले लोक खूप आहेत. परंतु पंतांसारखा प्रामाणिक, गंभीर आणि अनुभव अंगीं बाणणें कठीण आहे.

—सी. राजगोपालाचारी.

ज्यांनी आमच्या मनांत सुरक्षितपणाची आणि विश्वा-साची भावना निर्माण केली अशा त्या भारतमातेच्या वीर सुपुत्राचें संकटकाळीं नेहमींच स्मरण होईल. त्यांच्या मृत्यूनें केवळ त्यांचे चाहते, मित्र किंवा कुटुंब नव्हे तर राष्ट्रच शोकसागरांत बुडून गेलें आहे. —सुचेता कृपालानी, विकास व श्रम मंत्रीनी.

मराठी ग्रंथ . . . , ठा. स्त्र
(७१ अनुक्रम .. दि: ..
क्रमांक ........ नों: दि: ........

पंडित पंत अनुसूचित जाती आणि जमातींचे सर्वस्वी श्रेष्ठदर्जाचे मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ होते.

—श्री. राजभोज, अध्यक्ष भारतीय दलित सेवक संघ.

भारतीय राष्ट्रीय ट्रेड युनियन काँग्रेसचे पंत हे श्रेष्ठ आधार स्तंभ होते. नेहरूंनीं सर्वांत योग्य सहकारी गमावला.

—श्याम प्रसाद वसावडा, मजूर नेता.

पंडित पंतांच्या स्वरूपांत देशाच्या सार्वजनिक जीवनांतील एक अद्‌भुत व्यक्तित्त्व नष्ट झालें आहे. जे त्यांच्या सहवासांत आले त्यांना पंतांच्या प्रतिभेची, निर्णयशक्तिची आणि व्यक्ति परिक्षा हे सर्व गुण परिचित आहेत.

—श्री प्रकाश, राज्यपाल, महाराष्ट्र प्रदेश.

भारताचा श्रेष्ठ सुपुत्र निघून गेला. गांधीच्या बरोबर आयुष्यभर राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं झगडले. काम करीत असतांनाच त्यांनीं आपले आयुष्य वेंचलें. ते कुशल राजकारणी होते आणि राष्ट्राचे प्रश्न साहसानें आणि निष्ठेनें सोडवींत.

——मास्टर तारासिंग.

पंडित पंत प्रत्येक अडचणींत आमच्या बरोबर राहिले, आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनीं आम्हांस प्रत्येक अडचणीतून मुक्त केले. सन १९४६ मध्यें फाळणीनंतर सर्वच भिऊन गेले परंतु ते महात्मा गांधींच्या बरोबर एखाद्या अभेद्य तटाप्रमाणें निश्चल राहिले आणि जातीयतेशीं निकरानें लढा दिला.

——श्री. चंद्रभान गुप्त, मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश राज्य.

ज्यांनी बिकट परिस्थिति आणि संकटाच्या भोवऱ्यांतून देश नौकेस पुढें नेण्याकरतां जिवापाड यत्न केले. ते पंडित पंत

महासागरांतील एक श्रेष्ठ सुकाणू प्रमाणें होते. आम्हीं राजकारणांत त्यांचे विरोधक असून देखील त्यांच्याकडून सुरक्षा आणि दयेची अपेक्षा करीत असूं. जेव्हां जेव्हां त्यांना मी भेटून येई तेव्हां असं वाटे कीं सर्व चिंता त्यांना देऊन मी परतत आहे. ज्याप्रमाणें महात्मा गांधी, पंडित मोतिलाल नेहरू आदींच्या निधनामुळें युगरूपी तटास मोठा तडा गेला, त्याच प्रमाणें पंतांच्या मृत्युनें त्यास तडा गेला.

—श्री. अशोक मेहता, अध्यक्ष, प्रजासमाजवादी

देशाच्या दोन सफल गृहमंत्र्यांपैकीं पंत एक होत. सरदार पटेलांनी देशी राज्यें भारतीय राज्य संघांत विलीन केली आणि पंतांच्या वेळीं देशांत भाषावार प्रांत रचना झाली.

—श्री. यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्रीं महाराष्ट्र राज्य

गेलीं ५५ वर्षे ते आणि मी बरोबर आहोंत. त्यांचा देशभक्तीरूपी आग्नि किती प्रखर होता तें मीं जाणतो. देशहित हेच त्यांचे सर्वस्व होतें. आपल्याला या महान नेत्याच्या चरण चिन्हांवरूनच चालले आहिजे

—डॉ. कैलासनाथ काटजू, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १९६९५

## परिशिष्ट

सप्टेंबर १०, १८८७ अलमोडा जिल्ह्यांत जन्म.

१९०६ त्रिवेणी संगमांवर माघ मेळ्यांत पहिलें राजकीय भाषण आणि कॉलेजमधून हकालपट्टी.

१९०९ एल्.एल्.बी.ची परीक्षा उत्तीर्ण केली. " लुम्सडेन सुवर्ण पदक " मिळाले.

१९१६ राजनीतींत सक्रिय प्रवेश; कुमायूं परिषदेची स्थापना; साऊथबरो समितीसमोर साक्ष.

१९२१ काँग्रेसमध्यें सम्मिलित. वकिलीचा त्याग. अ. भारतीय काँग्रेस महासमितीचे सदस्य.

१९२३ संयुक्त प्रांत विधान सभेचें सदस्यत्व. स्वराज्य दलाचे नेते आणि विरोधी दलाच्या नेत्याच्या रुपानें सुमारे सतत सात वर्षें कार्य.

१९२७ संयुक्त प्रांत काँग्रेस समितीचे अध्यक्षपदीं निवड. अलिगड अधिवेशनाचें प्रमुखपद भुषविले.

१९२८ सायमन कमिशनच्या भारत आगमनाच्यावेळीं कडक निदर्शनें करण्यांत अग्रगण्य. लखनऊमध्यें पंडित नेहरूंच्या बरोबर जबर जायबंदी.

१९३० सत्याग्रह चळवळींत प्रथम तुरुंगवास. त्रिपुरा काँग्रेस गाजविली.

१९३१ किसान समस्या निवारणेच्या हेतूनें काँग्रेसतर्फे मध्यस्थ. किसान समितीच्या अध्यक्षस्थानी नेमणूक. अ. भारतीय काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद. पंत-प्रतिवेदनाचे जनक.

... मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39248 दि: 21/2/1
क्रमांक ...2611...... नों: दि: 21/6/1

१९३४ कॉंग्रेस संसदीय मंडळाचे मंत्री कॉं. केंद्रिय विधान सभेंत नेमणूक आणि कॉंग्रेस दलाचे उपनेते.

१९३७ संयुक्त प्रांत विधान सभेंत नेमणूक. विधानसभा कॉंग्रेस पक्षाचे नेते. प्रांतात प्रथम लोकनियुक्त सरकारची रचना. प्रांताचे मुख्यमंत्री.

१९४५ भारताचा व्हाईसरॉय लॉर्ड व्हेवेलनें आखलेल्या सिमला संमेलन प्रसंगीं मु क्त. हिंदु मुस्लिम समस्या सोडविण्याकरितां जिनांशी विचारविनिमय करून योग्य तो मार्ग काढण्याकरितां कॉंग्रेसतर्फें नेमणूक.

१९४६ संयुक्तप्रांताचे परत मुख्यमंत्री.

१९४७ दिल्लींत कॉंग्रेस महासमितीच्या बैठकींत भारत विभाजन चा प्रस्ताव प्रस्तुत केला. देश स्वतंत्र झाल्यावर संयुक्त प्रांतांचा सरकारी कारभार उर्दू लिपीच्या ऐवजीं देवनागरी लिपींत करण्याचा आदेश.

१९५४ डिसेंबर भारताचे स्वराष्ट्रमंत्री.

१९५६ नागपूर विश्वविद्यालयांकडून डॉक्टर ऑफ लॉच्या सन्मानपूर्वक पदवीनें शोभीवंत. राज्यपुनर्रचना कायदा संसदें पुढें ठेवला.

१९५७ राष्ट्राची सर्व श्रेष्ठ "भारतरत्न" पदवीनें विभूषित.

१९५८ संसदीय कॉंग्रेस दलाचे उपनेते.

१९६० हृदयविकाराचा प्रथम त्रास.

फेब्रुवारी २०, १९६१ मस्तकांतील रक्तदोषाच्या रोगानें आजारी–शेवटपर्यंत बेशुद्धावस्थेतच राहिले.

मार्च ७, १९६१ मृत्यु.

———

REFBK-0011614
REFBK-0011614